गुरूवार, ११ जुलै २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३०५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 11 JULY 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-305 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

## पसरले हिरवेगार गालिचे!



आधुनिक केसरी

पर्जन्याचा शिडकावा होताच मातीतल्या बिया अंकुरांच्या रूपांनी तरारून वर आल्या आणि अवघ्या देवगिरी किल्ल्यावर जणू हिरवेगार मखमली गालिचेच पसरले. किल्ल्याचे हे नयनरम्य दृश्य पर्यटकांना भुरळ पाडत आहे. छायाचित्र : प्रकाश लकडे

## महाराष्ट्रातील पहिल्या महिला ग्रामविकास अधिकारी श्रीमती सुजाता गवई यांना दैनिक आधुनिक केसरीचा शासकीय सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर


आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** महाराष्ट्रातील पहिल्या महिला अधिकारी ग्रामसेवक म्हणून 1997मध्ये मान मिळवणाऱ्या औराळा (ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर) येथे ग्रामविकास अधिकारी पदावर कार्यरत श्रीमती सुजाता गवई यांना दैनिक आधुनिक केसरीचा शासकीय सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर झाला आहे. औराळा व मक्रणपूर येथे श्रीमती गवई यांनी शासनाच्या विविध योजना, उपक्रम यशस्वीपणे राबवले.



शेततळे, सेंद्रीय शेती, शेतकरी गट, शेडनेट, पॉलीहॉऊस, कांदाचाळ, फळबाग लागवड, पाणंद रस्ते, घरकुल योजना, प्रत्येक घरी शौचालय, पीक विमा योजना, पीएम किसान योजना, शासन आपल्या दारी आदी कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी, तसेच शेतकरी व महिलांसाठी विविध शिबिरे इत्यादी शासनाच्या योजना वाड्या-वस्त्यांवर जाऊन शेतकऱ्यांना समजावून सांगून या योजना प्रभावीपणे राबवत आहेत. औराळा परिसरातील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडवल्याने त्या शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या जणू गळ्यातील ताईतच बनल्या आहेत. सर्वांना आपलेसे करत व अधिकारी पदावर असूनही सामाजिक बांधिलकी जपत समाजातील शेवटच्या घटकासाठी त्या महत्त्वाचे कार्य करत आहेत. कोरोना काळातही त्यांचा मोलाचा वाटा होता. तसेच महाराष्ट्रातील पहिली महिला ग्रामविकास अधिकारी म्हणून त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत आधुनिक केसरी वृत्तपत्र समूहाच्या वतीने विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन ग्रामविकास अधिकारी श्रीमती सुजाता गवई यांना आधुनिक केसरीचा शासकीय सेवेतील राज्यस्तरीय 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार देण्यात येत आहे. लवकरच या पुरस्काराचे वितरण छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच स्तरांतून श्रीमती सुजाता गवई यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# आरक्षणावरून अधिवेशनात राडा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात बुधवारी कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर प्रथम सत्ताधारी आमदारांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन विरोधकांना घेरण्याचा प्रयत्न केला. मंगळवारी मुंबईत मराठा आरक्षणाबाबत चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र या बैठकीला मविआच्या नेत्यांनी दांडी मारली होती. हाच धागा पकडत सत्ताधारी आमदारांनी महाविकास आघाडी मराठा आरक्षणाच्या विरोधात आहे. त्यांना मराठा-ओबीसी ही समस्या सोडवायची नसून हा मुद्दा धगधगता ठेवून त्यावर आपली राजकीय पोळी भाजायची आहे, असा आरोप सत्ताधारी गटाच्या आमदारांनी केला. त्यामुळे विरोधक प्रचंड आक्रमक झाले आणि विधानसभेत प्रचंड गोंधळ पाहायला मिळाला. यानंतर काही वेळातच विरोधकांनी विधानपरिषदेत ओबीसी आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करत हा हिशेब चुकता केला.**

ओबीसी आणि मराठा आरक्षणाची बैठक विधिमंडळात का घेतली नाही, असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. त्यावर ओबीसी मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या बैठकीला उपस्थित न राहिल्यामुळे सत्ताधाऱ्यांकडून जोरदार गोंधळ घालण्यात आला. ही परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधानपरिषदेच्या सभागृहात मार्शल्सना पाचारण केले. तसेच सभागृहातील सदस्यांना एकमेकांपासून एक फूट अंतर ठेवून उभे राहण्याचे निर्देश दिले. उपसभापतींनी सभागृहात मार्शल्सना पाचारण केल्यानंतरही सत्ताधारी आणि विरोधकांचा जोरदार गोंधळ सुरुच राहिला. याच गोंधळामध्ये उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडून पुरवण्या मागण्या मंजूर करत कामकाज रेटण्याचा प्रयत्न झाला. मात्र, विरोधकांनी सभागृह डोक्यावर घातले, त्याला सत्ताधारीही तितक्याच त्वेषाने प्रत्युत्तर देत होते. अखेर वाढता गोंधळ पाहता नीलम गोऱ्हे यांच्याकडून विधानपरिषद सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

**मराठा आरक्षणावरील सुनावणी 5ऑगस्टपर्यंत तहकूब :** राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेल्या 10 टक्के आरक्षणाची कायदेशीर लढाई सुरु असून बुधवारी मुंबई उच्च न्यायालयात याबाबत सुनावणी झाली. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांवर सरकारच्यावतीने राज्य मागास आयोगाकडून बाजू मांडण्यात येत आहे. मात्र, आयोगाचे वकील विदेशात असल्याने मुदतवाढ मिळावी, अशी मागणी आयोगाच्यावतीने करण्यात आली होती. त्यावर, उच्च न्यायालयाने तीन आठवड्यांची मुदतवाढ आयोगाला दिली आहे. तर 5 ऑगस्टपासून पुढील सुनावणी होणार आहे. मराठा आरक्षणाबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी मागास आयोगाला आणखी मुदतवाढ हवी आहे. आयोगाचे वकील सध्या परदेशात असल्याने आयोगाच्यावतीने कोर्टाकडे याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानंतर, तीन आठवड्यांत राज्य मागासवर्ग आयोगाने आपली भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे, पुढील तीन आठवड्यापर्यंत राज्य मागासवर्गीय आयोगाला मुदतवाढ मिळाल्याचे दिसून येते. तर आयोगाने मांडलेल्या भूमिकेवरील प्रतिज्ञापत्रावर इतर सर्व प्रतिवाद्यांना 10 दिवसांत उत्तर देण्याचे निर्देशही हायकोर्टाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे, आता ऑगस्टपर्यंत न्यायालयाने मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर वादी व प्रतिवादींना म्हणणे मांडण्यास अवधी दिला आहे. त्यानंतर, न्यायालयाची नियमित सुनावणी सुरु होणार आहे.

## दहशतवाद्यांच्या शोधासाठी हेलिकॉप्टरसह मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या कथुआ जिल्ह्यात सोमवारी झालेल्या हल्ल्यात ५ जवान शहीद तर अन्य ५ जवान जखमी झाले होते. लष्कराच्या गस्ती पथकावरील या प्राणघातक हल्ल्यास जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी मंगळवारी मोठ्या प्रमाणावर संयुक्त शोधमोहीम सुरू करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जमिनीवरील शोधपथकांना हेलिकॉप्टर तसेच मानवरहित हवाई पाळत ठेवून मदत केली जात आहे. या भागातील काही घनदाट जंगल भागांवर लक्ष केंद्रित करून कारवाईत स्निफर डॉग आणि मेटल डिटेक्टरही कार्यरत ठेवण्यात आले आहेत. कथुआ जिल्ह्याच्या मुख्यालयापासून १५० किमी अंतरावर लोहाई मल्हारमधील बदनोटा गावाजवळील माचेडी-किंडली-मल्हार या डोंगराळ रस्त्यावर लष्कराच्या गस्ती पथकावर झालेला हा पहिलाच दहशतवादी हल्ला होता. हल्ल्यानंतर दहशतवादी जवळच्या जंगलात पळून गेले. याच पार्श्वभूमीवर लष्कर, पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलातर्फे माचेडी, बडनोटा, कुंडली, लोहाई मल्हार परिसरात संयुक्त शोधमोहीम सुरू केली.

# स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीनंतरही झोपडपट्टीवासियांना रस्त्याची प्रतीक्षाच

## साहेब, चिखलातून अंगणवाडीत जावे कसे? चिमुकल्यांचा टाहो

आधुनिक केसरी न्यूज


**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** रिसोड तालुक्यातील श्री क्षेत्र लोणी बु. येथील झोपडपटीकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरी नंतरही लोणी बुद्रुक येथील ग्रामस्थांना, लहान शाळकरी मुलांना चिखलमय असलेला रस्ता तुडवत मार्गक्रमण करावे लागते. थोडा जरी पाऊस आला तरी रस्त्याने चिखलातून जावं लागते. याला नागरिकांसह लहान मुले देखील कंटाळली आहेत.अनेक निवडणुकामधे निवडणूक कालावधीत उमेदवारानी या रस्त्याच्या आश्वासनाची खैरात देखील केली. मात्र निवडणूक झाल्यानंतर आपल्या वचनाची पूर्तता मात्र अद्यापही प्रतीक्षेत आहे. तर लोणी बुद्रुक येथील लहान सहान चिमुकल्यांना शाळेत, अंगणवाडीमधे याच चिखलातून जावे लागत आहे. देश एकीकडे चंद्रावर,मंगळवार मार्गक्रमण केले असेल तरीही मात्र जन सामान्यांचे मात्र मूलभूत प्रश्नच अद्यापही सुटलेले नाहीत ही दरी कशी भरून निघणार त्यातच वाशिम जिल्ह्याला अकांशित जिल्हा म्हणून लागलेला ठसा मिटवण्यासाठी जिल्हा प्रशासन मोठा आटा पिटा करत असेल तरीही मूलभूत सोई सुविधा जशा शिक्षण, आरोग्य, वीज, सुसज्य रस्ते, पुरविण्यात कुठेतरी शासन, प्रशासनासह लोकप्रतिनिधी कमी पडत असल्याचे नागरिकांकडून बोलल्या जात आहे. ग्रामीण भागात अद्यापही फारशा मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी चिमुकल्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी निगडीत असलेल्या या रस्त्याचा कायमचा प्रश्न सोडवावा, रस्ता दुरूस्तीबाबत प्रशासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात, असा सूर झोपडपट्टी वासियांमधून उमटत आहे.



लोणी बुद्रुक येथील गावापासून ते झोपडपट्टी वर जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. मागील तीन वर्षांपासून आम्ही अनेकवेळा जिल्ह्यातील आमदार, खासदार, यांना निधी उपलब्ध करून देऊन लोणी बुद्रुक येथील झोपडपट्टी वासियांचा रस्त्याचा प्रश्न कायम स्वरुपी मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. तसेच त्या बाबत ठराव घेऊन प्रशासनाला देखील कळवले परंतु त्याला केराची टोपली दाखवण्यात आली. तरी प्रशासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा.
**प्रिया चौगुले], सरपंच लोणी बुद्रुक**

आमची रस्त्याची मागणी ही अनेक वर्षापासूनची आहे. आम्हाला अद्यापही आम्ही मूलभूत सुविधांपासून कोसोदुर आहोत. निवडणुकी पुरता आमच्या मतांचा वापर सर्वच लोकप्रतिनिधी करून घेतात. आणि निवडणूक झाली की आमच्या तोंडाला पाने पुसली जातात. हे आमच्यासाठी नवीन नाही आमचा रस्त्याचा प्रश्न कायम स्वरुपी निकाली न निघाल्यास आम्ही येणाऱ्या निवडणुकीमध्ये मतदानावर बहिष्कार टाकण्याच्या निर्णयात आहोत.
**तान्हाजी पारवे ग्रामस्थ झोपडपट्टी लोणी बुद्रुक**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

कामांमधून आपल्याला मिळणारा रिकामा वेळ त्या शोधतात आणि त्याचा खुबीने उपयोग करून घेतात. आपण मात्र बऱ्याच वेळेला मला वेळ नाही म्हणून बऱ्याच नवीन गोष्टी करण्याचे टाळत असतो. त्या दृष्टीने डॉ शारदा यांचे उदाहरण मार्गदर्शक आहे. वेळेच्या नियोजनासोबतच अनुभव घेण्याची वृत्ती, एखादी गोष्ट जाणून घेण्याचे कुतूहल या गोष्टी त्यांना काम करण्यासाठी प्रेरित करतात. त्या म्हणतात आपण जगणं एन्जॉय करायला शिकलं पाहिजे. सगळ्या गोष्टी आपल्या हातात नसतात. फार पुढचा विचार न करता जो क्षण आता आपल्या हातात आहे, तो आपण आनंदी करावा. आपल्या आईवडिलांबद्दल सांगताना त्या म्हणतात, ' माझ्या आईवडिलांनी मला नवीन गोष्ट शिकण्यापासून कधीही परावृत्त केलं नाही. कधीही बक्षीस मिळवून आण म्हणून सांगितलं नाही. त्यांनी मला एखादी गोष्ट करून पाहण्याचे स्वातंत्र्य दिले आणि ते करण्यास प्रोत्साहन दिले. ' आपण पालकांनी सुद्धा मुलांना नंबर आला पाहिजे, बक्षीस मिळाले पाहिजे असा दबाव मुलांवर न आणता त्यांना ' करके देखो ' अशा भावनेतून प्रोत्साहन दिले पाहिजे असे त्यांना वाटते. निसर्ग हे आपलं सगळ्यात मोठं ' रोल मॉडेल ' आहे.







**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## आनंदाचा मार्ग

'श्री स्वामी समर्थ' हा मंत्र, हे नाव जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. हे नाव साधनाही आहे आणि साध्यही, सगुण आहे आणि निर्गुणही. या नावाचा आरंभ सगुणात आहे तर शेवट निर्गुणात आहे. ते जेव्हा सगुणात आले तेव्हाच त्याला नाम रूप प्राप्त झाले. सगुण व निर्गुण भक्तीला आधार या नावाचाच आहे. नामस्मरण हा सत्संगाचा कळसही आहे आणी पायाही. श्री स्वामी समर्थ नावाचे स्मरण म्हणजे आपली वृत्ती आणि श्री स्वामी महाराज यांना जोडणारी साखळी आहे. हे नाव प्रेमाने घ्यावे, नियमाने घ्यावे, मनापासून घ्यावे, उत्साहाने घ्यावे, चिकाटीने घ्यावे. नामस्मरणाला नितीची, सदाचरणाची व कर्तव्याची जोड द्यावी. नामस्मरणाने वृत्ती सुधारते, वृत्ती सुधारली की चित्त शांत होते. चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होते. आपण मुखाने नामस्मरण करावे आणि आपल्या कानांनी ते ऐकावे आणि नामस्मरण करता करता स्वतःला विसरून जावे, हाच सेवेतला आनंदाचा मार्ग आहे. जसे आपले आपलेपण आपल्या नावात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नावात असते. जसजशी आपली देहबुद्धी कमी होते. तसतसे हे नाव व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते आणि शेवटी श्री स्वामी समर्थ हे नाव परमात्मा स्वरूपच आहे असा अनुभव येतो. नामस्मरण अंतःकरणात इतके खोल जावे की प्राणाबरोबर ते बाहेर पडावे. अंतःकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे श्री स्वामी महाराजांचे नाव. त्यांच्या नामस्मरणातच आपला शेवटचा श्वास गेला पाहिजे.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

आणि सांगितले की, मातोश्री ! हा पुत्र वरदायक आहे. करभंजन म्हणून जो नवनारायणांपैकी एक त्याचाच हा अवतार आहे. ह्याचे



उत्तम रितीने संगोपन कर, तेणेकरून तुझे कल्याण होईल व जगाने नावाजण्यासारखा हा निपजेल; हा पुढे कसा होईल हे मातोश्री, मी तुला आता काय सांगू? पण याचे सेवेसाठी मूर्तिमंत कैलासपति उतरेल. ज्याचे नाव निवृत्ति असेल त्यास हा अनुग्रह करील. याचे नाव गहिनीनाथ असे ठेव. आम्ही तीर्थयात्रेस जातो. पुन्हा बारा वर्षांनी हा आमचा बाळ गोरक्षनाथ येथे येईल, तेव्हा तो ह्यास अनुग्रह करील. मग मोहनास्त्र मंत्र म्हणून विभूति तिचे अंगावर टाकताच, तिच्या स्तनात दूध उत्पन्न झाले. मग मुलास स्तनपान करविल्यानंतर तिने गावातील सुवासिनी बोलावून मुलास पाळण्यात घालून गहिनीनाथ असे त्याचे नाव ठेविले. पुढे मच्छिंद्रनाथ काही दिवस तेथे राहिला व गावकऱ्यांची रजा घेऊन गोरक्षासहवर्तमान तो तीर्थयात्रेस गेला. जाताना गोरक्ष अजून कच्चा आहे असे मच्छिंद्रनाथास दिसून आले. मग त्यास बदरिकेद्वार स्वामींच्या हवाली करून तपास लावावे असे मनात जाणून अनेक तीर्थयात्रा करीत करीत ते बदरिकाश्रमास गेले. मच्छिंद्रनाथास सोन्याच्या विटेचा मोह, समाराधना, गहिनीनाथास गोरक्षाचा उपदेश मच्छिंद्र व गोरक्षनाथ सौराष्ट्र गावांहून निघाले ते मार्ग क्रमीत तैलंगणांत गेले. तेथें त्यांनीं गोदेचे संगमीं स्नान करून श्रीशिवाचे पूजन केले. पुढे आंवढ्यानागनाथ, परळीवैजनाथ आदिकरून तीर्थे केल्यावर महारण्यात गर्भागिरी पर्वतावर जे वाल्मीकिऋषीचे स्थान आहे, तेथे ते आले. ते अरण्य महाभयंकर, वाट देखील धड उमगेना; अशा त्या घोर अरण्यांतून प्रवास करण्याचा प्रसंग आल्यामुळे मच्छिंद्रनाथ भिऊन गेला. त्याचे कारण असे होते कीं, स्त्रीराज्यातून निघतांना त्यास मैनाकिनी राणीने जी सोन्याची वीट दिली होती ती कोणास न समजू देता त्याने झोळीत ठेविली होती. ती वीट चोर नेतील या धास्तीने त्याच्या जिवात-जीव नव्हता. ही सर्व भीति गोरक्षनाथाच्या लोभाबद्दल परीक्षा पाहण्यासाठीच होती, नाही तर मच्छिंद्रनाथास भीति कशाची असणार ! तो मार्गात चालत असतां गोरक्षास विचारी की, ह्या घोर अरण्यात चोरांची धास्ती तर नाहींना ? हे ऐकून गुरूला चोराचे भय कशासाठी असावे, ही कल्पना गोरक्षनाथाच्या मनात उत्पन्न झाली. गुरूजवळ काही तरी वित्त असले पाहिजे व ते चोर लुटून नेतील ही भीति त्यांना आहे, असा त्याने तर्क केला व ते भय निरसन होण्याचा उपाय योजावा, असा मनात विचार करून तो काही उत्तर न देतां तसाच मुकाटयाने चालत होता. इतक्यात त्यांस एक पाण्याचे ठिकाण लागले तेथे मच्छिंद्रनाथाने गोरक्षास अंमळ थांबावयास सांगितले.



आधुनिक केसरी

## मौन मंथनाने | सिद्ध व्हावे ||

करावी साधना | अखंड ज्ञानाची ||
आत्मानुभूतीची | जोड द्यावी ||१||
पोपट पंचीने | करी अध्ययन ||
करीसी कथन | ज्ञानार्जने ||२||
लागता कसोटी | प्रज्ञेच्या सभेत ||
हाती नवनीत | येते जाण ||३||
ज्ञानीयांच्या ठायी | असावी लीनता ||
नसावी पात्रता | अहंकारी ||४||
साधावी योग्यता | गुरूच्या कृपेने ||
मौन मंथनाने (साधनेने) | सिद्ध व्हावे ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आपन रुप बनाइया,
लोहा अगिन स्वरुप ।
सत्ता दोनों अलग है, हँस पुरुष कर रुप
।।२८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/२८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
अग्नीत लोखंड तापवून-तापवून ते अग्नी स्वरूप होऊन जाते. अशाच प्रकारे योगाग्नीत जीव तापून-तापून तो ब्रह्म स्वरूप होऊन जातो. ज्याप्रमाणे लोह आणि अग्नी दोन पदार्थ आहेत, त्याप्रमाणेच जीव आणि ब्रह्म या दोन वेगवेगळ्या अनादि सत्ता आहेत. दोन्ही चेतन सत्तांचे गुण मिळून दोघांना एकस्वरूपता प्राप्त होते. वस्तूतः दोन्ही सत्ता भिन्न , वेगळ्या आहेत.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## संदेहवारण

आधुनिक केसरी

ब्रम्ह व ब्रम्हांड व्यापक आहे. ते आता सांगते. मी अनेक व्हावे अशी ब्रम्हाने इच्छा व्यक्त केली. त्याने तप केले. व सारी सृष्टी निर्माण




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

केली. व या सृष्टीचा तो जनक ठरला. याचाच अर्थ असा की ब्रम्ह व्यापक तर ब्रम्हांड व्याप्य आहे. एका ब्रम्हा खेरीज दुसरे अस्तित्व नाही. जे जे काही आहे ते ते सर्व ब्रम्ह आहे. संपूर्ण विश्वामध्ये आपल्याला जे जे दिसते ते ते सर्व ब्रम्हातूनचं निर्माण होते. ब्रम्हा पासुन निर्माण होते व शेवटी ब्रम्हातचं लिप्त होते. विरून जाते. किंवा एकरूप होते. यासाठी मी म्हणेन ब्रम्हांडात जितक्या विभूती तितकी रूपे तुझी देखा. असे असून देखील विश्व निर्माण करून त्यामध्ये ब्रह शिरले असे श्रृति सांगते. विश्व ज्या स्वरूपात आपल्याला दिसते त्यासारखे /ब्रम्ह नाही. म्हणून वेगवेगळ्या दोन दृष्टीकोनातून आपली दिशा ठरते.

## सद्गुरुस जावे शरण । संशयविरहित वृत्तीने घ्यावे नाम

आधुनिक केसरी

राम ठेवील जी स्थिति । त्यात समाधान राखे ज्याची वृत्ति । त्या नाव खरी विरक्ति ॥ रामाआड जें जें काही । तेथून दूर ठेवी वृत्ति । या नांव विवेकाची प्राप्ति ॥ वृत्ति न होऊ द्यावी विषयीं फार । चित्तीं चिंतावा रघुवीर ॥ जेव्हां वृत्ति होते विषयाकार । तेथें न राहे सारासार विचार ॥ वृत्ति राही अभिमानाला धरून । तेथें न राही कधीं अनुसंधान ॥ जें जें पाहावें तें तें रामच होईजे । ऐसी ठेवावी वृत्ति । रघुनंदन आणावा चित्तीं ॥ काळोख अत्यंत मातला । घालवावयास उपाय दुजा न सुचला । होतां सूर्याचें आगमन । काळोख जाईल स्वतः आपण ॥ तैसें ' राम कर्ता ' हा भाव ठेवतां चित्तीं । उपाधीरहित बनते वृत्ति ॥ वृत्ति असावी शुद्ध, संतसज्जनांना प्रमाण । त्याने संतुष्ट होईल नारायण ॥ जग स्वार्थमूलक खरें । हें आपले वृत्तीवरूनच ओळखणें बरें ॥ वृत्ति अलग करावी सर्वांहून । आलेली ऊर्मि करावी सहन । सर्व कर्ता जाणून रघुनंदन ॥ निःसंशय करावी वृत्ति आपण । सद्गुरूस जावें शरण । संशयविरहित वृत्तीने



घ्यावे नाम । जें सुखाचें आहे धाम ॥ शुद्ध ज्याचें अंतःकरण । शुद्ध ज्याचें आचरण । परमात्म्याबद्दल शुद्ध ज्याची वृत्ति । त्याच्याहून दूर न राहे रघुपति ॥ सर्व कांहीं करावें आपण । पण वृत्तीनें त्यांत न गुंतावे आपण ॥ नामांत ठेवावें प्रेम । तेथें प्रकटेल पुरुषोत्तम ॥ देहाचें चलन ज्याचे सत्तेनें । त्या रघुपतीचें स्मरण असावे आनंदाने ॥ वासना नामापायीं जडली । धन्य धन्य सज्जनीं मानिली ॥ पाणी माती एक झाले । वेगळे नाहीं करतां आले । निवळी घालावी पाण्यांत । पाणी स्वच्छ होतें जाण ॥ तैसा विषयांत राहून जगतीं । नामाची ठेवावी संगति ॥ विषयाचें विष शोषून घेई । ऐसी आहे नामाची प्रचीति ॥ शक्य तितकें राहावें नामांत । याहून दुसरें न आणावे मनांत ॥ परा पश्यंती वैखरी वाणी । याच्याही पलीकडे नाम ठेवा स्मरणीं । नामापरती उठेल वृत्ति । तेथें सावध असावें तुम्हीं ॥ जो नामांत राहिला दंग । त्याने लुटला रामरंग ॥ रामनाम बोलावें वाचा । काळ न येऊ द्यावा काळजीचा ॥ नामाविण राम । जैसें पाकळ्यांविण फूल जाण ॥ नाम ज्यानें घेतलें सर्वकाळ । जिंकला त्यानें एक अंतकाळ ॥

भगवंत ठेवील त्यांत हित मानावें । अखंड नामस्मरण घ्यावें ॥ नामांत स्वतःचा विसर । हेंच देईल रघुवीर ॥ भगवंताची प्राप्ति, संतांची संगति, नामाचे प्रेम, । हें भगवत्कृपेवाचून नाहीं साधत जाण ॥ सतत करावें नामस्मरण । सर्व इच्छा राम करील पूर्ण ॥

१९२. त्राता राम जाणून चित्ती । निर्भय करावी आपली वृत्ति ॥

## गगनगिरी महाराज

आधुनिक केसरी

गगनगिरी महाराज हे चालुक्य सम्राट पहिल्या पुलकेशीन ह्यांच्या घराण्यातील होते. 'श्रीपाद गणपतराव पाटणकर' (साळुंखे) हे त्यांचे मूळ नाव. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात असलेल्या 'मणदुरे' या ग्रामी १९०६ मध्ये झाला.[१] त्यांच्या वडिलांचे नाव गणपतराव व आईचे नाव विठाबाई. महाराजांचे वय तीन वर्षे असतानाच त्यांचे आईचे व पाच वर्षाचे असतानाच वडिलांचे निधन झाले. लहानपणापासूनच त्यांना ईश्वरप्राप्तीची ओढ होती. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांनी घर सोडले.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, ११ जुलै २०२४
adhunikkesari.com

# बस स्टँडच्या बिल्डिंगवर करोडो खर्च करण्यापेक्षा मामल्याच्या विद्यार्थ्यांसाठी बस उपलब्ध करून द्या

## डॉ. अभिलाषा बेहेरे गावतुरे : चंद्रपूर बसस्थानक प्रमुखांना निवेदन



आधुनिक केसरी न्यूज

**प्रेम गेहलोत**

**बल्लारपूर :** एकीकडे बस स्थानकाच्या सुशोभीकरणासाठी करोडो रुपये खर्च पण शालेय विद्यार्थ्यांना मात्र बस सुविधे अभावी शाळेपासून वंचित रहावे लागणे ही गंभीर समस्या आहे. शाळा व महाविद्यालय  नियमित सुरू झाले आहेत त्यामुळे  शालेय विद्यार्थ्यांची व प्रवाशांची संख्या भरपूर असल्याने काही विद्यार्थ्यांना उभे राहून प्रवास करावा लागत आहे. तर उर्वरित विद्यार्थ्यांना बसमध्ये घेतल्या जात नसल्यामुळे  विद्यार्थ्यांना शाळेपासून मुकावे लागत आहे.तसेच ज्या बसेस सुरू आहेत त्यांच्या वेळा अनियमित असल्यामुळे  शाळेचा तास व वर्ग सोडून बस पकडण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. व त्यामुळे वायगाव,निंबाळा व मामला परिसरातील शेकडो  विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या परिसरात बसेसच्या वेळा वाळवून त्यांची वेळ शालेय विद्यार्थ्यांना सोयीची होईल या मागणीसाठी शेकडो विद्यार्थ्यासह डॉ. अभिलाषा गावतुरे यांच्या नेतृत्वात चंद्रपूर बस स्थानक प्रमुख यांना निवेदन देण्यात आले.

बस एकच आणि विद्यार्थी आणि प्रवासी जास्ती त्यामुळे एका बसमध्ये सारे प्रवासी मावत सुद्धा नाही कित्येक जणांना बसमध्ये घेतल्या जात नाही त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळा बुडते बसचा वेळा विचित्र असल्यामुळे कित्येक विद्यार्थ्यांना पहिला किंवा शेवटचा तासाला मुका व लागते आणि त्यांच्या शैक्षणिक करिअरवर परिणाम होत आहे करोडो रुपये खर्च करून बस स्टेशन व इतर सुशोभीकरणाच्या,देखाव्याच्या वस्तू, बांधणारे सरकार व पालकमंत्री यांना विद्यार्थ्यांचे हे दुःख समजत नाही काय ही मागणी येत्या दोन दिवसात मंजूर न झाल्यास विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या प्रमाणात आंदोलन करतील असा इशारा देण्यात आला. याप्रसंगी समस्याग्रस्त विद्यार्थ्यांनी सुद्धा समोर येऊन आपल्या समस्याचा पाढा पाढा वाचून आपला रोष व्यक्त केला.

# सुषमा अंधारेंचा तिखट पलटवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई : देशातील गर्भश्रीमंत उद्योगपती मुकेश अंबानी यांचे सुपुत्र अनंत अंबांनीच्या लग्नसोहळ्याची सर्वत्र धूम आहे. मुंबईतील अँटिलिया या निवासस्थानी सेलिब्रिटींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, राजकीय नेतेही मागे नाहीत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि मुलगा तेजस ठाकरेही या लग्नसोहळ्याला पोहोचले होते. त्यानंतर, तेजस ठाकरे यांचा या लग्नसोहळ्यात डान्स करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे भाजपच्या नेत्यांनीही हा व्हिडिओ शेअर करत शिवसेना आणि ठाकरे कुटुंबीयांना टार्गेट केलं आहे. आता, भाजपच्या या टीकेला शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी तिखट शब्दात उत्तर दिले आहे.

अंबानींच्या लग्नातील डान्स सोहळ्यात तेजस ठाकरे डान्स करताना दिसून आले. त्यांचा हा व्हिडिओ समाजमाध्यवांवर व्हायरल झाल्यानंतर भाजप नेत्यांनी टीकेची संधी सोडलीच नाही. जो मराठी तरुण "गोविंद रे गोपाळा"  म्हणत दहिहंडीत नाचताना कधी दिसला नाही. तो  महाराष्ट्राचा उमदा तरुण चेहरा अंबानींच्या लग्नात शेवटच्या रांगेत उभे राहून नाचताना दिसला, अशी खोचक टीका भाजप आमदार आमदार आशिष शेलार यांनी केली होती.  भाजपच्या टीकेला शिवसेना समर्थकांनीही अमृता फडणवीसांचे नाव घेत प्रतिहल्ला केला होता. आता, सुषमा अंधारे यांनीही ट्विट करुन अमृतावहिनींचं नाव घेतलं आहे. तसेच, आशिष शेलार यांच्यावर तिखट शब्दात खोचक टीका केली. तोरणादारी/मरणादारी वैर मनात ठेवू नये म्हणतात असो हे समजायला संस्कार लागतात. ज्याची तुमच्याकडे वानवा आहे.अमृतावहिनी जशा राजकारणात नाहीत, त्यांना वैयक्तिक आयुष्य जगण्याचा अधिकार आहे तसंच आहे ते, असा पलटवार सुषमा अंधारे यांनी केला आहे. तसेच, बाय द वे तुम्हाला भांडी घासायलाही बोलावलं नाही का?, असा सवालही आशिष शेलार यांना टॅग करुन सुषमा अंधारे यांनी विचारला आहे.



# मोदींचे खडेबोल

आधुनिक केसरी

‘रशिया आणि युक्रेनदरम्यानचा प्रश्न युद्धभूमीवर सुटू शकणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याबरोबर मंगळवारी झालेल्या चर्चेदरम्यान नि:संदिग्धपणे सांगितले. क्रेमलिनमध्ये भारत-रशिया शिखर परिषदेला सुरुवात करताना मोदी यांनी युक्रेन युद्धावरून भारताची भूमिका स्पष्ट केली. बॉम्ब, बंदुका आणि बुलेट यामध्ये शांतता चर्चा यशस्वी होत नाहीत असे ते यावेळी म्हणाले. मोदी यांच्या दोन दिवसीय रशिया दौऱ्याचा मंगळवारी अखेरचा दिवस होता. पुतिन यांच्याबरोबरची चर्चा फलदायी असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले. गेल्या काही वर्षांमध्ये भारताला अन्न, इंधन आणि खतांचा तुटवडा होणार नाही यासाठी भारत-रशिया सहकार्याचा फायदा झाला अशी प्रशंसा मोदी यांनी केली. तर, मोदी यांनी युक्रेन प्रश्न सोडवण्यासाठी मदत करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल पुतिन यांनी त्यांचे आभार मानले. रशियाने फेब्रुवारी २०२२मध्ये युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर भारताच्या पंतप्रधानांचा हा पहिलाच रशिया दौरा आहे. या आठवड्याच्या शेवटी वॉशिंग्टनमध्ये ‘नाटो’ परिषद होत असताना, मोदींच्या रशिया भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. “रशियाने युक्रेन युद्धाबद्दल काहीही ठराव मांडण्यापूर्वी संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्याचा आदर करत युक्रेनच्या प्रादेशिक अखंडता, युक्रेनची स्वायत्तता विचारात घेतली पाहिजे, असे भारताने रशियाला स्पष्ट करावे”, अशी अपेक्षा अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी मंगळवारी व्यक्त केली. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांचे हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. पंतप्रधान मोदी सोमवारी रशियाला पोहोचत असतानाच, काहीच वेळापूर्वी रशियाच्या सैन्याने युक्रेनमधील काही इमारतींसह लहान मुलांच्या रुग्णालयावर क्षेपणास्त्र हल्ला केला. त्या संदर्भात द्विपक्षीय शिखर परिषदेदरम्यान मोदी म्हणाले की, निष्पाप मुलांचा मृत्यू हृदय पिळवटून टाकणारा आणि अतिशय वेदनादायक असतो. भारत शांततेच्या बाजूने आहे आणि चर्चेच्या मार्गानेच संघर्षाचे निवारण केले पाहिजे या भूमिकेबाबत त्यांनी आंतरराष्ट्रीय समुदायाला आश्वस्त केले. दुसरीकडे, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी, रशियाचे क्षेपणास्त्र युक्रेनमधील लहान मुलांच्या रुग्णालयाला लक्ष्य करत असताना पंतप्रधान मोदी यांनी अध्यक्ष पुतिन यांची गळाभेट घेतल्याबद्दल आक्षेप घेतला आहे. आपली नाराजी त्यांनी ‘एक्स’वर व्यक्त केली आहे.

# वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत सुविधांची पातळी

आधुनिक केसरी



डॉ. प्रितम भि. गेडाम
संपर्क क्र. ८२३७४ १७०४१

**भारत हा जगातील सर्वात जास्त तरुण लोकसंख्या असलेला देश असून लोकसंख्या क्षेत्रफळापेक्षा खूप जास्त वाढली आहे, त्यामुळे विकासाचे चक्र मंदावून समाजातील प्रत्येक नागरिकाला, घटकाला सुविधा देणे कठीण होते. विविध परिस्थितीमुळे प्रत्येकाला पुढे जाण्याची संधी मिळत नाही किंवा आवश्यक विकास शक्य होत नाही, त्यामुळे देशात संसाधनांचे अत्याधिक वापर, झोपडपट्टी, अस्वच्छ वातावरण, प्रदूषण, अशुद्ध हवा-पाणी, खालावलेले राहणीमान यांसारख्या समस्या निर्माण होतात.**

पुढे या समस्या इतर समस्यांना म्हणजे आर्थिक विषमता, भूक, कुपोषण, बेरोजगारी, महागाई, अंमली पदार्थांचे व्यसन, गुन्हेगारी, भेसळ, भ्रष्टाचार यांसारख्या समस्यांना झपाट्याने वाढतात. लोक आपल्या स्वार्थानुसार जगू लागतात, नैतिकता, नीतिनियम, सामूहिक जबाबदारी, देशाप्रती कर्तव्याची भावना फक्त नावापुरतीच उरते. अन्नदाता शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाही आहेत. प्रत्येक वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारी योजना, आयोग, कायदे, धोरणे, मंत्रालये, विभाग, संस्था असूनही लोक समस्यांशी झुंज देत आहेत, कारण त्यांना आवश्यकतेनुसार योग्य सुविधा मिळत नाहीत. आपल्या देशाच्या अनेक राज्याची लोकसंख्या जगातील अनेक विकसित देशांच्या लोकसंख्येपेक्षाही जास्त आहे. युनायटेड नेशन्स डेटा वर्ल्डोमीटर विस्ताराच्या आधारे, १ जुलै २०२४ पर्यंत भारताची सध्याची लोकसंख्या १,४४,१६,९६,०९५ होती. भारताची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १७.७६ टक्के आहे. लोकसंख्येच्या आधारावर भारत पहिल्या क्रमांकावर आहे. बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार, सप्टेंबर २०२३ पर्यंत देशावर २०५ लाख कोटी रुपयांचे कर्ज झाले, गेल्या दहा वर्षांत कर्जात १५० लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे, तर २००४ मध्ये कर्ज १७ लाख कोटी रुपये होते. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम रिपोर्ट २०२१ नुसार, भारताची शैक्षणिक गुणवत्ता जगात ९० व्या क्रमांकावर आहे, ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार, भ्रष्टाचार धारणा निर्देशांक २०२३ मध्ये भारत १८० देशांपैकी ९३ व्या क्रमांकावर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील झोपडपट्ट्यांची लोकसंख्या अंदाजे ६५ दशलक्ष आहे, जी शहरी भारताच्या १७ टक्के आणि भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ५.४ टक्के आहे. महाराष्ट्रातील झोपडपट्ट्यांची लोकसंख्या १.१८ कोटी होती, त्यानंतर आंध्र प्रदेशात १.०२ कोटी होती.

देशात संपत्ती आणि उत्पन्नात बरीच असमानता आहे, जी सतत वाढत आहे. भारतातील संपत्ती असमानता दर्शवते की शीर्ष १० टक्के लोकसंख्येकडे एकूण राष्ट्रीय संपत्तीपैकी ७७ टक्के हिस्सा आहे, देशातील ५३ टक्के संपत्ती सर्वात श्रीमंत १ टक्के लोकांकडे आहे. सर्वात गरीबीतील अर्ध्या लोकांकडे राष्ट्रीय संपत्तीचा फक्त ४.१ टक्के आहे. जागतिक विषमता अहवाल २०२२ नुसार, शीर्ष १० टक्के लोकांमध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५७ टक्के आहे आणि वरच्या १ टक्क्यांकडे राष्ट्रीय उत्पन्नाच्या २२ टक्के आहे. सर्वात खालचे ५० टक्केवाल्यांचा वाटा १३ टक्के राहिला. देशाच्या एकूण वस्तू आणि सेवा कराच्या जीएसटी रकमेपैकी सुमारे ६४ टक्के पैसा तळाच्या ५० टक्के लोकांकडून आला आहे, तर फक्त ४ टक्के हा वरच्या १० टक्के लोकांकडून आला आहे. एफएओ, आईएफएडी, यूनिसेफ, डब्ल्यूएफपी आणि डब्ल्यूएचओ यांच्या संयुक्त अहवालानुसार, जगातील ४२.१ टक्के लोकसंख्येला सकस पौष्टिक अन्न उपलब्ध नाही, तर भारतीय लोकसंख्येसाठी हा आकडा ७४.१ टक्के



आहे. जगातील ९.२ टक्के लोकसंख्येच्या तुलनेत १६.६ टक्के भारतीय कुपोषित आहेत. जागतिक भूक निर्देशांकात १२५ देशांपैकी भारत १११ व्या क्रमांकावर आहे, जे भूक तीव्रतेची गंभीर पातळी दर्शवते.

ब्लूमबर्गचा नैटिक्सिस एसए च्या अहवालानुसार, भारताला २०३० पर्यंत ११.५ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याची गरज आहे, म्हणजेच दरवर्षी १.६५ कोटी रोजगार. २०३० पर्यंत जगात प्रत्येक पाचवा काम करणारा भारतीय असेल. अलीकडेच, इन्स्टिट्यूट ऑफ ह्युमन डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने 'इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४' नावाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की भारत तरुणांच्या वाढत्या बेरोजगारीला झुंजत आहे. भारतातील बेरोजगार कर्मचाऱ्यांपैकी सुमारे ८३ टक्के तरुणांचा समावेश आहे आणि एकूण बेरोजगारीमध्ये माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांचा वाटा २००० मधील ३५.२ टक्क्यांवरून २०२२ मध्ये ६५.७ टक्के पर्यंत जवळपास दुप्पट झाला असा अंदाज आहे. देशातील बेरोजगारीची स्थिती सर्वांनाच माहीत आहे. शिपाई पदासाठीही मोठ्या संख्येने उच्च शिक्षित आणि पीएचडी पदवीधारक देखील अर्ज करतात. सरकारी उपाययोजना आणि धोरणे असूनही सामाजिक विषमता कायम आहे. डब्ल्यूएचओ दर १००० लोकसंख्येमागे १ डॉक्टर आणि ३ नर्स असण्याची शिफारस करते, तर देशात दर १००० लोकसंख्येमागे ०.७३ डॉक्टर आणि १.७४ परिचारिका आहेत. शासकीय विभागातील मोठ्या प्रमाणात पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याने बहुतांश विभागांमध्ये अनेक वेळा शासकीय आदेश व कामाचा बोजा पडतो, याचा फटका सर्वसामान्यांना सहन करावा लागत आहे. उदाहरणार्थ, ट्रॅफिक पोलिसांच्या कमतरतेमुळे अनेक शहरांमध्ये ट्रॅफिक सिग्नलवर ट्रॅफिकची समस्या आहे, म्हणजेच प्रत्येक ट्रॅफिक सिग्नलवर ट्रॅफिक पोलिस दिसत नाहीत, त्यामुळे बहुतांश वाहने सिग्नल तोडूनच जातात. अपघात झाल्यास वेळेवर मदत मिळत नाही, वाहतूककोंडीत रुग्णवाहिकांनाही निघायला जागा मिळत नाही. काही ठिकाणी रस्ते खोदून सोडले असते, काही ठिकाणी रस्त्यावर कचऱ्याचे ढीग पडले असते, काही ठिकाणी गटारी उघडी असते, काही ठिकाणी पिण्याचे पाणी वाहत असते, काही ठिकाणी पथदिवे दिवसा सुरू असते. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे शिक्षण, आरोग्य, पोलिस, न्याय सर्वच क्षेत्रात समस्या दिसून येत आहेत, त्यामुळे कामे प्रलंबित असतात. कामाचा दर्जा खालावतो आणि सर्वसामान्यांचे जीवन संघर्षमय बनते. अशा परिस्थितीत सत्तेतील लोक, अधिकारी, कर्मचारी स्वतःच्या स्वार्थासाठी पदाचा दुरुपयोग करण्याची शक्यता वाढते. लोकसंख्येच्या तुलनेत सुविधा कमी आहेत आणि मागणीपेक्षा पुरवठा कमी झाला की दर्जा घसरतो ही वस्तुस्थिती आहे. शहरे आणि महानगरे १० वर्षात त्यांची लोकसंख्या दुप्पट करत आहेत, जर ग्रामीण भागाचा विकास झाला आणि तेथील लोकांना उत्तम शिक्षण, आरोग्य सुविधा आणि रोजगाराच्या चांगल्या संधी दिल्या तर त्यांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होईल. वाढत्या लोकसंख्येमुळे सरकारी यंत्रणा, तंत्रज्ञान आणि नैसर्गिक संसाधनांवर दबाव येतो. लोकसंख्या नियंत्रण आणि कार्यक्षम प्रशासन असेल तरच प्रत्येकाला उत्तम शिक्षण, आरोग्य, रोजगाराच्या सुविधा मिळू शकतील, सर्व मुलांचे उत्तम संगोपन होईल, तरच प्रत्येकाचे जीवनमान सुधारेल. शासनाने निर्धारित वेळेत कामे पूर्ण करावीत, सर्वांना शिक्षणाप्रमाणे रोजगार मिळावा. प्रत्येक विभाग आणि क्षेत्र मजबूत करण्यासाठी दरवर्षी नोकर भरती व्हायला हवी. प्रत्येक घरात शिक्षणानुसार सरकारी नोकरी योजनेवर भर द्यावा, सर्व मोफत सरकारी योजना बंद कराव्या लागल्या तरी चालेल, कारण प्रत्येक कुटुंब स्वावलंबी होऊन आपल्या कुटुंबासाठी चांगले जीवनमान मिळवू शकते. जर शिपायापासून ते कलेक्टरपर्यंत, प्रत्येक सरकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक, आमदार, खासदार आणि सरकारमध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाने सरकारी शाळा, कॉलेज, रेल्वे, बस, सरकारी हॉस्पिटल अशा सरकारी सेवांचा लाभ स्वतःसाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी घेतला तर त्यामुळे या विभागांचा आणि क्षेत्राचा झपाट्याने विकास होऊन गुणवत्ता वाढेल. उदाहरणार्थ, मोठ्या नेत्यांच्या दौऱ्याच्या वेळी रस्ते रात्रभरात दुरुस्त होतात, सगळीकडे स्वच्छता दिसते. या विचाराने देशाला लवकरच नवसंजीवनी मिळू शकते. सरकारी यंत्रणा मजबूत, दर्जेदार, पारदर्शक आणि विकसित असावी. प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा सहज पूर्ण झाल्या पाहिजेत. सरकारला पूर्ण सहकार्य करणे आणि धोरणात्मक नियमांचे पालन करणे ही जनतेची जबाबदारी आहे.

# ...आणि भाजपला ‘माधव’ आठवला !

आधुनिक केसरी



श्रीपाद सबनीस
संपर्क क्र. 9960542605

**सोशल इंजिनिअरिंगच्या आधारे भाजप दीर्घकाळ राजकारण करत आहे. मात्र, २०१४ नंतर मराठा समाजावर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे भाजपचा ‘माधव’ फॉर्म्युला मागे पडला होता. २०२४ च्या निवडणुकीत भाजपला याचा फटका बसला. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्याचे दृश्य परिणाम पहायला मिळाले. त्यामुळेचा भाजपला आता विधानसभा निवडणुकीच्या चार महिने आधी राज्यात ओबीसी मतांची भर पडावी यासाठी पुन्हा ‘माधव’ फॉर्म्युल्याकडे परतणे भाग पडले. उल्लेखनिय म्हणजे विधान परिषद निवडणुकीत भाजपने पंकजा मुंडे, डॉ. परिणय फुके, अमित बोरखे, योगेश टिळेकर आणि सदाभाऊ खोत यांना दिलेली उमेदवारी यासंदर्भात पुरेशी बोलकी ठरते.**

यापैकी तीन उमेदवार ओबीसी समाजातील आहेत. तर प्रत्येकी एक उमेदवार दलित आणि मराठा आहेत. भाजप नेत्या पंकजा मुंडे या ओबीसी वंजारी समाजातून येतात. ओबीसी समाजामध्ये माळी, धनगर आणि वंजारी हे प्रमुख समाज आहेत. पुण्यातील योगेश टिळेकर हे माळी समाजातील आहेत. तर, डॉ. परिणय फुके हे देखील ओबीसीतील कुणबी जातीतून येतात. त्यामुळे भाजपने पुन्हा एकदा महाराष्ट्रात ओबीसी मतांवर आपले राजकारण केंद्रित केल्याचे दिसून येत आहे. अमित बोरखे आणि सदाभाऊ खोत हे दलित आणि मराठा समाजातीलही उमेदवार भाजपने दिले आहेत. राज्यात ३१ टक्क्यांपेक्षा जास्त मराठा आहेत, तर ओबीसी ४० टक्क्यांच्या जवळपास आहे. परंतु, ते ३५६ पोटजातींमध्ये विभागले गेले आहेत. या दोन समाजांना आपल्या गोटात आणण्याची रणनीती सध्या भाजप आखत आहे. भाजप नेते वसंतराव भागवत यांनी गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, पांडुरंग फुंडकर, महादेव शिवणकर या नेत्यांच्या सहकार्याने महाराष्ट्रात ओबीसी समाज प्रामुख्याने माळी, धनगर आणि वंजारी (माधव) यांना आपल्या गोटात आणण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते.

गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्रातील ओबीसींचा प्रमुख चेहरा होते. पण, २०१४ मध्ये त्यांच्या निधनामुळे पक्षाला मोठा धक्का बसला. २०१४ च्या निवडणुकीपासून राज्यात पक्षाचा विस्तार करण्यासाठी भाजप नेतृत्वाने डझनभर मराठा नेत्यांना पक्षात सामील केले. भाजप नेतृत्वाने ओबीसी नेत्यांना पूर्णपणे बाजूला केले आणि देवेंद्र फडणवीस भाजपचा मुख्य चेहरा झाले. तर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याबरोबरच मराठा समाजाला कुणबी जातीचा दर्जा दिल्याने ओबीसींमध्ये नाराजी वाढली. त्यामुळेच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागले. ही चूक विधानसभा निवडणुकीत पुन्हा होऊ नये यासाठी पुन्हा एकदा ओबीसी जातींना महत्त्व देण्याचा प्रयत्न भाजपकडून होत आहे. त्याचवेळी मराठा आणि दलित समाजाला राजकीय महत्त्व देऊन समतोल साधण्याचीही रणनीती आण्यात आली आहे. सुमारे चार दशके बाजूला ठेवलेल्या ‘माधव’ फॉर्म्युल्याची भाजपला पुन्हा एकदा आठवण झाली आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये!

**माधव पॅटर्न आणि आजचा भाजप...** भाजपचा संपूर्ण राज्यामध्ये प्रसार व्हावा, समाजातील सगळ्या घटकांपर्यंत हा पक्ष पोहचावा यासाठी वसंतराव भागवत यांनी राज्यभरातून दहा तरुण कार्यकर्ते निवडले होते. या सर्वांनी भागवतांपासून प्रेरणा घेऊन पक्षाचे पूर्ण वेळ काम करण्याचा निर्णय घेतला. या मुलांमध्ये प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, विश्वास गांगुर्डे, धरमचंद चोरडिया, प्रकाश जावडेकर, भाऊसाहेब फुंडकर, चिंतामण वनगा, अरुण अडसड यांचा समावेश होता. त्याचबरोबर मधू पवार, माधव भांडारी, रमेश मेढेकर यांनाही भागवत यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांनी राज्यामध्ये पक्षाचा प्रसार करण्यासाठी पूर्ण वेळ वाहून घेतले. या बहुजन समाजाच्या नेत्यांना धरून प्रमोद महाजनांसारख्या ब्राह्मण समाजाच्या नेत्याची सांगड घालत भाजपाने महाराष्ट्रात आपले साम्राज्य हळूहळू पसरवलं. २०१४ च्या विधानसभा निवडणुकानंतर गोपीनाथ मुंडे यांचं अपघाती निधन झालं आणि भाजपमध्ये बऱ्याच घडामोडी घडल्या. देवेंद्र फडणवीसांना मुख्यमंत्री करण्यात आलं आणि भाजपच्या माधव पॅटर्नचे सूत्रे फडणवीसांच्या हातात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली आजही भाजप हा पक्ष माधव पॅटर्ननुसार चालतोय. मधल्या राजकीय उलथापालथीमध्ये पक्ष सत्तेतून गेला पण तरीही मुंडे-महाजन यांनी दाखवून दिलेल्या वाटेवरच भाजप चालेल असं फडणवीस यांचं म्हणणं आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# व्यावसायिक कौशल्य विकसित करीत स्वयंरोजगाराला प्राधान्य द्यावे

## कुलसचिव डॉ.अनिल हिरेखन : पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज




**गडचिरोली :** गडचिरोली सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला जिल्हा आहे. वनाच्छादीत जिल्हा असल्याने याठिकाणी रोजगाराची वाणवा आहे. येथील तरुणांनी रोजगारासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त केल्यास रोजगाराच्या अमर्याद संधी मिळू शकतात. मात्र, स्वयंरोजगारातून आपल्या कला, कौशल्य, कल्पकता व गुणांना संधी मिळते. स्वयंरोजगारातून अन्य बेरोजगारांना रोजगार देऊन बेरोजगारी कमी करता येते. त्यामुळे तरुणांनी आपले कौशल्य विकसित करत स्वयंरोजगाराला प्राधान्य द्यावे, असे आवाहन गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अनिल हिरेखन यांनी केले.

गोंडवाना विद्यापीठ आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्याच्या उद्घाटनाप्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलसचिव डॉ. हिरेखन बोलत होते.

कार्यक्रमाला रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त योगेंद्र शेंडे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आमुदाला चंद्रमौली, वाणिज्य विभागाचे प्राध्यापक उत्तमचंद कांबळे, सहायक प्राध्यापक डॉ. अनिरुद्ध गजके तसेच विविध कंपन्याचे प्रतिनिधी, महामंडळाचे प्रतिनिधी, शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषण करतांना, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन म्हणाले, कंपन्यांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाची निवड कौशल्याच्या आधारावर केली जाते. त्यामुळे कौशल्यपुर्ण मनुष्यबळ तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. ही गरज लक्षात घेवून विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना अल्फा अकॅडमीच्या माध्यमातून संगणकीय कोडींग, 'सीआयआयआयटी' प्रकल्पाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रातील तांत्रिक प्रशिक्षण, तसेच विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनेला व सशोंधनाला चालना देण्यासाठी ट्रायसेफ नवसंशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून कौशल्याधारीत शिक्षण देण्यात येत आहे. त्यासोबतच विद्यापीठात कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. स्पर्धा परीक्षा तसेच इतर क्षेत्रातही चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील तरुण हळूहळू पुढे येत आहे. विद्यापीठामार्फत राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक योजना तसेच जिल्हा प्रशासनाच्या विविध योजनांची अमंलबजावणी विद्यापीठाकडून केल्या जाते. युवकांनी रोजगारासोबतच स्वयंरोजगाराकडे देखील वळावे, जेणेकरुन इतरांना रोजगार देता येईल, असे कुलसचिव डॉ. हिरेखन म्हणाले.

सहायक आयुक्त योगेंद्र शेंडे म्हणाले, नियोक्ता आणि विद्यार्थी यांना एकत्रित आणून रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे यासाठी सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली. वर्षभरात जिल्ह्यामध्ये 125 मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचेही सहायक आयुक्त श्री. शेंडे यांनी सांगितले. अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली म्हणाले, चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील युवकांमध्ये भरपूर कौशल्य भरले आहे. कौशल्याच्या जोरावरच रोजगारप्राप्ती होत असते. विद्यार्थ्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याचे कार्य विद्यापीठाकडून केले जात आहे. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होतील.

# पोलीस पाटलाच्या घरावर चोराचा डल्ला; एक लाख रुपये लांबवले

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** कोपरगाव शहारालगत असलेल्या जेऊर पाटोदा येथील पोलीस पाटील हरिभाऊ सयाजी केकाण यांच्या घरात चोराने प्रवेश करून पॅन्ट च्या खिशातील साठ हजार व लाकडी कपाटावर ठेवलेले चाळीस हजार असे एकूण एक लाख रुपये रोख रक्कम घेऊन चोर पसार झाला. या बाबतीत अधिक असे की जेऊर पाटोदाचे पोलीस पाटील हे आपल्या कामानिमित्त बाहेरगावी जाण्यासाठी रात्री तीन साडेतीन च्या सुमारास प्राथविधी करिता घराबाहेर असलेल्या शौचालयात गेले जाताना त्यांनी घराला कुलूप किंवा कडी न लावता गेले व तेथून पुन्हा घरात येऊन अंघोळीकरिता घरातील बाथरूमात गेले मात्र त्यावेळेस ही त्यांनी घराचे दार लोटून घेतले मात्र आतून कडी किंवा कुलूप लावले नाही याच संधीचा फायदा अज्ञात चोरट्याने घेऊन पॅन्टच्या खिशात असलेले साठ हजार व लाकडी कपाटावर असलेले चाळीस हजार असे एकूण एक लाख रुपयांची रोख रक्कम घेऊन चोर पसार झाला. पोलीस पाटील हरिभाऊ केकाण हे अंघोळ करून परत आले असता त्यांनी कपडे घालत असताना पैसे असलेली पॅन्ट दिसून न आल्याने त्यांनी त्यांनी लाकडी कपाटावर असलेले पैसे घेण्याकरिता घेले असता त्यांना तेथीही पैसे दिसून न आल्याने त्यांनी पॅंटीचा शोध घेण्याकरिता घराबाहेर आले आले असता त्यांना ती पॅन्ट घराच्या बाहेर असल्याचे दिसले त्यांनी आपल्याघराबाहेर असलेल्या सिसिटीव्ही तपासले असता त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यांनी शहर पोलीस स्टेशनाला कळविले असता शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, पोलीस उपनिरीक्षक रोहिदास ठोंबरे, व पोलीस हेड कॉन्स्टेबल जाधव यांनी तात्काळ घटनास्थळ गाठले व पुढील तपास सुरु केला. यावेळी पोलीस पाटील हरिभाऊ केकाण यांनी दिली.

# दुधात भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यातील नागरिकांना गायी-म्हैशीचे निर्मल दूध मिळावे, दुधात भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी यासाठी राज्य शासन गंभीर आहे. दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाला अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. दूधभेसळीसंदर्भात विधानसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहाला दिली.

दूध भेसळीच्या समस्येची गंभीरता लक्षात घेऊन यापूर्वी राज्यसरकारने दोषींना फाशीची शिक्षा देण्याचा कायदा केला होता. हा कायदा राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. मात्र, दूध भेसळीच्या गुन्ह्यात फाशीची शिक्षा देणे ही शिक्षा तुलनेने फार मोठी असल्याचे राष्ट्रपती कार्यालयाचे मत असावे, त्यामुळे त्यावर अद्याप राष्ट्रपतींची सही झालेली नाही असे अजित पवार म्हणाले. दूधात अजिबात भेसळ होऊ नये, ग्राहकांना निर्मल-भेसळमुक्त दूध मिळावे, अशीच राज्य शासनाची भूमिका आहे. याबाबत शासन गंभीर असून त्यासंदर्भात वित्तमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, संबंधित मंत्री महोदयांच्या उपस्थितीत अन्न व औषध प्रशासन विभागाची बैठक घेतली जाईल. दूध भेसळ रोखण्यासाठी विभागाला आवश्यक असणारे मनुष्यबळ, यंत्रसामग्री, अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. दूध भेसळ रोखण्यासंदर्भातील प्रक्रियेत काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दुरुस्त करण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात दिली.

सध्याच्या परिस्थितीत दूध उत्पादकांच्या दुधाला बऱ्यापैकी दर मिळू लागले आहेत. अशावेळी झोपडपट्टी भागामध्ये किंवा इतर अज्ञात ठिकाणी काही व्यक्तींकडून भेसळ केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. जास्त दर असणाऱ्या ब्रॅन्डच्या दूध पिशव्यांमध्ये पाणी मिसळणे, इंजेक्शनने भेसळसारखे गैरप्रकार केले जातात. अशा भेसळयुक्त दुधामुळे आजार बळावतात, जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. या गोष्टी अतिशय गंभीर असून त्यासंदर्भात अत्यंत कडक भूमिका घेण्याची राज्य शासनाची तयारी आहे. या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

# ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या चर्चेविना मंजूर

## जयंत पाटील यांचा सरकारवर आरोप

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या एका शब्दाचीही चर्चा न करता मंजूर करण्यात आल्या यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी चांगलाच संता व्यक्त केला आहे. सभागृहात सत्तारूढ पक्षाने गोंधळ घातला आणि सभागृह तहकूब करत महाराष्ट्राच्या माथ्यावर ९४ हजार कोटींचा नवा भुर्दंड मारला आहे. या पुरवणी मागण्यांना विरोधीपक्ष नाकारतील याची खात्री असल्याने हा पळपुटेपणा सरकारने केला आहे अशी जोरदार टीका त्यांनी केली. जयंत पाटील पुढे म्हणाले की, काल सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. यापूर्वीही दोन बैठका झाल्या होत्या. महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी वारंवार भूमिका स्पष्ट केली होती. काल आरक्षणाच्या मथळ्याखाली बैठक बोलावण्यात आली होती. विधानपरिषद आणि विधानसभेतील विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन एकमताने या बैठका घेणे अपेक्षित होते. तर त्याला योग्य स्वरूप आले असते. मात्र त्यांनी कोणतीही चर्चा केली नाही. सरकारने मराठा आणि ओबीसी समाजातील घटकांशी चर्चा केली. त्यांनी याबतीत काहीतरी निर्णय घेतला पाहिजे. ठोस निर्णय न घेता, विरोधी पक्ष बैठकीला आला नाही याचा कांगावा करण्यात काहीच अर्थ नाही. तुमच्याकडे २०६ आमदारांचे बहुमत आहे. त्यामुळे सभागृह चालवताना घाबरण्याचे काही कारण नाही असेही म्हणाले आजच्या पुरवणी मागण्या अवैध मार्गाने मान्य केलेल्या आहेत. ६ लाख ७० हजार कोटींचे एक बजेट मांडून, दुसऱ्या मिनिटाला ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या. ही महाराष्ट्रात आर्थिक गोंधळ निर्माण करणारी प्रवृत्ती आहे असे म्हणत त्यांनी आपली नाराजी दर्शवली.

# आरक्षणप्रश्नी मंत्र्यांमध्येच एकवाक्यता नाही : पटोले

## स्वतःचे पाप लपवण्यासाठी महायुती सरकारकडून राजकारण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात आरक्षणाचा प्रश्न गंभीर होण्यास महायुती सरकारच जबाबदार आहे. सरकारने २०१४ पासून मराठा समाजाला आरक्षणाचे आश्वासन दिले आहे. केंद्रात व राज्यातही भाजपाचे सरकार आहे, त्यांची इच्छाशक्ती असती तर त्यांनी आरक्षण दिले असते. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी तर मराठा आरक्षण प्रश्नावर गुलाल उधळला तो कशासाठी, असा सवाल उपस्थित करून सरकारचा एक मंत्री ओबीसी आंदोलनात जाऊन जाहीरपणे विरोधी भूमिका घेतो. सरकारमध्येच आरक्षण प्रश्नावर एकमत नाही, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

आरक्षण प्रश्नावर विधिमंडळ परिसरात प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, आरक्षण प्रश्नावर सर्वपक्षीय बैठकीला विरोधी पक्षाचे नेते गेले नाहीत म्हणून आरोप केले जात आहेत ते चुकीचे आहेत. याआधीही आरक्षणप्रश्नावर सर्वपक्षीय बैठक झालेली आहे, सरकारला फक्त निर्णय घ्यायचा आहे तो त्यांनी घ्यावा. वडेट्टीवार हे विरोधी पक्षनेते म्हणून जरांगे पाटील व ओबीसी आंदोलकांना भेटले व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यात चुकीचे काय, विरोधी पक्ष नेत्याचे कर्तव्य त्यांनी पार पाडले. सरकारमध्ये आरक्षण प्रश्नावर एकमत आहे का त्याचे उत्तर सरकारने द्यावे. स्वतःचे पाप लपवण्यासाठी सरकार राजकारण करत आहे, असेही पटोले म्हणाले. सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या होत असताना सर्वोत्कृष्ट कृषी पुरस्कार कसा ? कृषी क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट राज्याचा पुरस्कार महाराष्ट्राला मिळाला आहे त्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. महाराष्ट्र कृषी क्षेत्रात पिछाडीवर आहे हे परवाच जाहीर झालेल्या आर्थिक पाहणी अहवालातही स्पष्ट सांगितले आहे मग महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी पुरस्कार कशाच्या आधारावर दिला आहे. केंद्रातील भाजपा सरकारने या पुरस्कारासाठीचे निकष बदलले आहेत का, असा सवाल विचारून ज्या राज्यात जास्त शेतकरी आत्महत्या त्या राज्याला कृषी पुरस्कार दिला असावा, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

# वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांकडे फडणवीसांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांचे महत्वपूर्ण प्रश्न शासन, प्रशासन स्तरावर गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. कंत्राटी कामगार विविध सनदशीर मार्गाने आंदोलने, करित आहेत पण अद्याप पर्यंत शासनाने कोणतेही दखल घेतली नाही, विधी मंडळात या बाबतीत आमदारांनी विचारलेल्या प्रश्नांना सुध्दा वस्तुस्थिती न मांडता मुख्य मुद्दाच वगळला गेला. फक्त किमान वेतन रू १४ ते १५ हजारावर कायम कामगारांच्या प्रमाणेच, रिक्त पदांवर कार्यरत कंत्राटी कामगारांना वेतन वाढी बाबतीत वंचित ठेवुन फक्त कायम कामगारांनाच वेतन वाढ घोषित करून कंत्राटी कामगारांची निराशाच केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कंत्राटी वीज कामगारांनी दि ९ जुलै रोजी आझाद मैदानावर लाक्षणिक निदर्शने केले. या सरकार जगाव आंदोलनात मात्र उर्जा मंत्री, कंपनी प्रशासनाला जाग आली नाही. त्यामुळे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ महाराष्ट्र राज्यात जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर आमरण उपोषण करण्याचा ईशारा महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांचे सचिन मेंगाळे यांनी दिला.

# डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकसाहित्याला वैश्विक दृष्टिकोन दिला

## डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे : राज्यस्तरीय लोकगंगा पुरस्कार वितरण समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** दिवंगत डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकसाहित्याच्या क्षेत्रामध्ये वैश्विक दृष्टिकोन देण्याचे काम केले. लोकसाहित्याचा अभ्यास हा प्रयोगनिष्ठ वाङःमय कलेचा अभ्यास आहे, असे ते मानत असत. त्याचबरोबर साहित्याच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सोडवले पाहिजेत असा त्यांचा विचार होता असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले. दिवंगत साहित्यिक डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशन च्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. हमाल पंचायत येथील सभागृहात झालेल्या या पुरस्कार वितरण कार्यक्रमास पद्मगंगा फाउंडेशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, समिक्षक डॉ. सुधाकर शेलार, डॉ. संदीप सांगळे, डॉ. मुसा बागवान, डॉ. सुनील शिंदे, डॉ. धोंडीराम वाडकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ.



संजीव कुलकर्णी (कथा संग्रह - शास्त्र काट्याची कसोटी), कवयित्री सरोज अल्हाट (काव्य संग्रह अनन्यता), अंबादास हिंगे (कादंबरी - शिवराम), कृष्णा जाधव (संत साहित्य - एक तरी ओवी), प्रदिप मेहेंदळे (आत्मकथन), डॉ. हंसराज जाधव (महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य), डॉ. भारत हंडीबाग (गौरव ग्रंथ) यांना साहित्य क्षेत्रातील पुरस्कार तर ॲड. विश्वनाथ गोलावर (समाजभूषण), प्रा. डॉ. दत्तात्रय वाघ यांना (आदर्श प्राचार्य), रवींद्र काळे (शैक्षणिक), अविनाश कदम (दर्पण पत्रकारिता), डॉ. सुभाष नागरगोजे (क्रीडारत्न) तर दादा विधाते (समाज भूषण) पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे पुढे म्हणाले की, डॉ. धोंडीराम वाडकर यांनी आपले गुरुवर्य दिवंगत प्रा. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशन ची स्थापना केली. गेल्या १७ वर्षापासून ते साहित्य, कला, क्रीडा, पत्रकारिता, समाजकार्य व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करतात. या माध्यमातून सबंध समाजाला प्रोत्साहित करण्याचे काम डॉ. धोंडीराम वाडकर करतात. यावेळी डॉ. सुधाकर शेलार, डॉ. संदीप सांगळे, डॉ. मुसा बागवान डॉ. सुनील शिंदे, कवयित्री सरोज आल्हाट, प्राचार्य दत्तात्रय वाघ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर यांनी प्रास्ताविक केले. विठ्ठल बरसमवाड यांनी सूत्रसंचालन केले. तर कल्याणी बरसमवाड यांनी आभार मानले. प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. या कार्यक्रमास साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# दोन महिन्यात काम पूर्ण करून बाबूपेठ उड्डाण पूल नागरिकांच्या सेवेत रुजू करा : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** निवडणूक आल्यावर काही प्राथमिक कामांच्या यादीत बाबूपेठ उड्डाण पुलाचे काम होते. या पूलाचे काम जलद गतीने पूर्ण व्हावे यासाठी आपला सातत्याने पाठपुरावा राहिला. रेल्वे विभागातर्फे पुलाच्या तिसऱ्या भागाचे काम सुरू होते. त्यामुळे कामात विलंब झाला, मात्र आता हे काम दोन महिन्यात पूर्ण करून सदर पूल नागरिकांच्या सेवेत रुजू करा, असे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा आयुक्तांना दिले आहे.

महानगर पालिका अंतर्गत येणाऱ्या विविध विषयांना घेऊन आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा प्रशासनासह बैठक घेतली. यावेळी सदर उड्डाण पूलाच्या कामासाठी लागणारा ५ कोटी रुपयांचा निधी आपण उपलब्ध करून देणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले असून पुलाचे काम दोन महिन्याच्या आत सुरू करण्याच्या सूचना केल्या आहेत. या बैठकीला मनपा अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त रविंद्र भेलावे, सहाय्यक आयुक्त सचिन माकोडे, नरेंद्र बोबाटे, अमूल भुते, अमोल शडके, अमित घुले, शहर अभियंता विजय बोरिकर, रविंद्र हजारे, डॉ. नयना उत्तरवार, राहुल पंचबुद्धे, रविंद्र कांबळे, रफिक शेख, सारिखा शिरभाते, राहुल भोयर, आशिष भारती आदींची उपस्थिती होती.

बाबूपेठ रेल्वे रुळ हा येथील नागरिकांसाठी मोठी समस्या आहे. येथे उड्डाण पूल तयार करण्यात यावा, अशी येथील नागरिकांची जुनी मागणी आहे. आपण निवडून आल्यावर या प्रस्तावित कामाला गती देण्याचे काम केले. मध्यंतर निधी अभावी काम रखडले होते. यासाठी पाठपुरावा केला. नंतर रेल्वे पुलाच्या कामाला गती मिळाली होती. मात्र रेल्वे विभागाअंतर्गत पुलाच्या तिसऱ्या भागाच्या कामामुळे विलंब झाला. मात्र आता हे काम पूर्ण झाले आहे. केवळ पालिका अंतर्गत करण्यात येणारी कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे आपण ही कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत. यासाठी लागणारा ५ कोटी रुपयांचा निधी तात्काळ मिळवून देणार असल्याचेही आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.



# व्याहाड पेठ, नेरी मानकरच्या विद्यार्थ्यांसाठी एसटी धावली

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** व्याहाड, पेठ व नेरी मानकर या गावातून शेकडो विद्यार्थी नागपूर शहरांमध्ये शिक्षणासाठी येतात परंतु त्याकरिता त्यांना बरेच किलोमीटरचे अंतर पायी तुडवत अमरावती हायवेवर बस करिता यावे लागत होते. त्यापैकी बरेच शालेय विद्यार्थी सी. पी. अँड बेरार हायस्कूल रवीनगर नागपूर येथील आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरी जायला देखील खूप उशीर होत होता. या गंभीर विषयाची दखल घेत गावातील सरपंच, स्थानिक नागरिकांनी व सी. पी. अँड बेरार हायस्कूल रवीनगर शाळेतील शिक्षकांनी एसटी महामंडळाला बस सुरू करण्याचे निवेदन दिले होते. विद्यार्थ्यांशी संबंधित असलेल्या या गंभीर विषयाची तात्काळ दखल घेत मा. शैलेश भारती विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी व मा.अभय बोबडे आगार व्यवस्थापक घाट रोड नागपूर यांच्या पुढाकाराने व मा. कृष्णा रंदई मुख्याध्यापक व विपीन निखाडे यांच्या सतत पाठपुराव्यामुळे व्याहाड, पेठ, नेरी मानकर ते रवीनगर नागपूर अशी एसटी महामंडळाची दैनंदिन फेरी शालेय वेळेवर सुरू करण्यात आलेली आहे. या फेरीमध्ये विद्यार्थिनींना अहिल्याबाई होळकर मोफत प्रवास योजनेचा व बस पास योजनेचा लाभ मिळत असून विद्यार्थ्यांची रोजची पायपीट थांबल्यामुळे विद्यार्थी व नागरिक सुखावले आहे. त्यामुळे आता ग्रामीण भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या बस फेरीचा व या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन अनिल शिवणकर यांनी केले. प्रसंगी विपिन निखाडे, विनय वड्याळकर, दिनेश खेरडे, खोजराम बारसागडे, बस चालक आर. व्ही. राऊत वाहक सौ. थेटेकर, कमलाकरजी आंदे ईश्वर थुटूरकर, राजू तट्टे बावणे विद्या थुटूरकर, सुरेंद्र नावाने, जितेंद्र चालले, कोटांगळे, घाटोळे, श्रीमती सोनूताई वानखेडे, मोहन लोडे प्रामुख्याने उपस्थित होते.

# विमा कंपनीवर कुठलेही बंधन नाही; मग शेतकऱ्याच्या तक्रारीला अल्टिमेटम का?

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील २०२३-२४ च्या रब्बी हंगामामध्ये एक रुपयात पीकविमा योजनेंतर्गत सात लाख शेतकऱ्यांनी रब्बी क्षेत्र पिक विमा भरून संरक्षित केले. सात लाख रब्बी विमा भरणाऱ्या शेतकऱ्यां पैकी सत्तावीस हजार शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात तक्रारी केल्या मात्र आलेल्या तक्रारीपैकी अवकाळी पावसामुळे झालेल्या अंदाजित अकरा हजार शेतकऱ्यांना पिक विमा कंपनी कडून विमा रक्कम देण्यास सुरूवात झाली आहे. त्यातील अंदाजे चार ते पाच हजार शेतकऱ्यांना विमा कंपनीच्या सवडीनुसार,नियमानुसार पीक विम्याचे पैसे मिळाले आहेत. उर्वरित पाच ते सहा हजार शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून कंपनीच्या प्रोटोकॉल नुसार, वेळेनुसार पैसे मिळणार आहेत. कंपनीच्या या मनमानी कारभारामुळे जिल्ह्यातील शेतकरी वर्ग मधून मात्र तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. कारण विमा भरतानी सीएससी सेंटरवर शेतकऱ्याची लूट होते. विमा संरक्षित झाल्यानंतर नैसर्गिक आपत्तीमुळे मोबाईल वरून क्लेम करताना नेमकं नुकसानीची पातळी व कशाने नुकसान झाले हा योग्य पर्याय अडाणी शेतकऱ्याकडून निवडला जात नाही. कारण कोणत्या मंडळात कोणत्या नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाले? नुकसानीची टक्केवारी किती? याबद्दल बऱ्याचश्या शेतकऱ्यांना माहिती नसते. आज सोशल मीडि यावर एवढे ग्रुप आहेत. त्या त्या मंडळातील त्या त्या कृषी सहाय्याने तेथील शेतकऱ्यांचा ग्रुप काढून कुठल्या नैसर्गिक आपत्तीने शेती पिकाचे नुकसान झाले. व विम्याचा क्लेम करताना यांपैकी कुठला योग्य पर्याय निवडला जावा यासाठीच शेतकरयांना योग्य मार्गदर्शन होणे गरजेचं आहे. कारण विमा कंपनी कंपनीकडून शेतकऱ्यांना माहिती नसल्याचा फायदा वारंवार घेतला जात आहे. जनावरांकडून नुकसान रोगराई वादळ वादळी पाऊस गारपीट पिकात पाणी साचणे ढगफुटी दुष्काळ पूर येणे अवकाळी पाऊस अशा विविध कारणांचे पंधरा ते वीस पर्याय शेतकऱ्यांसमोर असतात. यापैकी कुठला योग्य पर्याय निवडावा जेणेकरून त्याचा लाभ शेतकऱ्याला होईल त्याबद्दल कृषी विभागाकडून माहिती दिली जावी असे शेतकऱ्यांना गरजेचे वाटत आहे.

# उत्तर प्रदेशात पावसामुळे १० जणांचे बळी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशात सोमवारपासून सुरू असलेल्या पावसामुळे वेगवेगळ्या दुर्घटना घडून १० जणांचा मृत्यू झाला आहे. गंगा, राप्ती आणि शारदा या नद्या वेगवेगळ्या ठिकाणी धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. देशभरात मोसमी पाऊस सक्रिय झाल्यानंतर मुसळधार पावसाने जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. आसामला मोठ्या प्रमाणात पुराचा तडाखा बसला असून मंगळवारी वीज कोसळून तीन जणांचा मृत्यू झाला. तर उत्तराखंडमध्ये गेल्या २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसात तीन जणांचा मृत्यू झाला.

# शिर्डी नगर परिषदेच्या हद्दीत २४ मोबाईल टॉवर

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात मोठ्या प्रमाणावर साईभक्त येत असल्याने भाविकाच्या व ग्राहकांना चांगली रेंज मिळावी म्हणून अनेक कंपन्यानी काहीच्या इमारतीवर तर काही हॉटेलच्या इमारतीवर भ्रमणध्वनीचे मोबाईल टॉवर भाडेतत्त्वावर उभारण्यात आले होते मात्र शिर्डी शहरात मोठ्या प्रमाणावर उभे असलेले हॉटेल व इमारती पाहता शहरात नेमके भ्रमणध्वनीचे अधिकृत व अनाधिकृत मोबाईल टावर गेल्या २४ वर्षात किती उभारण्यात आले आहे याची माहिती शिर्डी नगर परिषदेकडे माहितीच्या अधिकारात सामाजिक कार्यकर्ते विश्वास माघाडे माहिती मागितली होती. त्या माहितीच्या अधिकारात शिर्डी नगर परिषदेच्या हद्दीत २४अधिकृत मोबाईल टॉवर भ्रमणध्वनीसाठी उभारण्यात आल्याचे माहिती पुढे आली आहे. असे असले तरी अनाधिकृत टॉवर बाबत कुठलेही माहिती न दिल्याने आता टॉवर मोजुन खात्री करणार असल्याचे सांगितले. हे टॉवर उभारण्यात येत असताना त्या टॉवरचे मोठ्या प्रमाणावर वजन मोठ्या प्रमाणावर उंची असणारा सांगाडा या बाबत नियमावली असते त्यापोटी या कंपन्या इमारतीच्या मालकाना भाडे देखील अंदा करत असतात हे जरी खरे असले तरी अनुचित प्रकार होणार नाही यासाठी किती लोकांनी परवानगी घेतली आहे कोणाच्या जागेत याबाबत माहिती शिर्डी नगर परिषदकडे मागितली असता शिर्डी नगर परिषद हद्दीत १जानेवारी २०००ते १८ ऑक्टोंबर २०२३अखेर २४ टॉवर आधिक्रुत परवानगी घेऊन उभारण्यात आल्याची माहिती नावानिशी कोणाच्या जागेत आहे या बाबत



शिर्डी नगर परिषदेने दिली. यात एअरटेल, आय टी सी, रिलायन्स जिओ, जी आय टी, टाटा डोकोमो आय डी या, बीपीएल ,रिलायन्स ,भारती एअरटेल इसार टेलिकॉम इंडस टावर बीएसएनएल एटीसी, इंदूस लिमिटेड या कंपन्याचा समावेश असून असे असले तरी शिर्डी शहराची हद्द कमी असल्यामुळे निमगाव कोराळे, निघोज, साकुरी ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या अनेक इमारती व हॉटेलवर देखील मोठ्या प्रमाणावर टॉवरची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे

# शिर्डी येथे चालणाऱ्या हायप्रोफाइल सेक्स रॅकेटवर छापा

## तीन मुलींची सुटका : एकास पकडले; एक फरार

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** विभागाचे डीवायएसपी शिरीष वमने यांना ९जुलै रोजी गुप्त माहिती मिळाली की शिर्डी येथील हॉटेल साई वसंत विहार मध्ये एका इसमाने वेश्या व्यवसायाकरिता तीन मुलींना ठेवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत असले बाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्यांनी सदर ठिकाणी कारवाई करणे करिता त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आदेश केल्याने पथकातील अधिकारी यांनी हॉटेल साई वसंत विहार या ठिकाणी कारवाई करणे कामी एक बनावट ग्राहक तयार करून सदर हॉटेल येथे पाठविले तेथे उपस्थित असलेल्या व्यक्तीस सदर बनावट ग्राहक यांनी शारीरिक सुखाची मागणी केली असता त्या व्यक्तीने त्याचे हॉटेलमधील मुली दाखवून बनावट ग्राहकास शारीरिक सुखाच्या मोबदल्यात पैशाची मागणी केले. या बाबत पथकातील अधिकारी व पंचांची खात्री होतात हॉटेल साई वसंत विहार येथे छापा टाकून तीन मुलींना ताब्यात घेतले आणि वेश्याव्यवसाय चालवणारा शुभम अशोक आदमाने वय २७ राहणार कापूस वडगाव तालुका वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर यास ताब्यात घेतली असून त्याचा साथीदार २) नाना शेळके हा फरार झाला आहे वरील तीनही पीडित मुलींना पुढील कारवाई करिता महिला पोलीस कॉन्स्टेबल पवार यांची सोबत शिर्डी पोलीस स्टेशन येथे आणले आहे व वरील दोन्ही आरोपी विरुद्ध शिर्डी पोलीस स्टेशन येथे महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल सविता भांगरे यांचे फिर्यादीवरून शिर्डी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ४०४ /२०२४ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,७,८ प्रमाणे दाखल करण्यात आले आहे जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबर्मे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरिष वमणे मार्गदर्शनाखाली करण्यात आली या कारवाईत पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार कायदे, इरफान शेख, अशोक शिंदे, दत्ता तेलोरे, बाबा खेडकर, गणेश घुले, श्याम जाधव, सविता भांगरे, पवार चालक गोलवड ज्ञानेश्वर गांगुर्डे यांनी भाग घेतला.





# चंद्रपूर मनपा उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिका उपद्रव शोध पथकास मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे तुकूम परिसरातील खासरे इंटरप्राइजेस,बाजार वॉर्ड येथील मुनाफ टेभला,बंगाली कॅम्प येथील गुप्ता ट्रेडींग कंपनी, मुल्लाजी चिकन सेंटर अश्या विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत २०० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असुन ४० हजार रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

सदर कारवाई गोदाम, दुकाने यावर करण्यात आली असुन कारवाईदरम्यान प्लास्टिकचे ताट, कप, ग्लास, चमचे,खर्रा पन्नी अश्या स्वरूपाचे प्रतिबंधित प्लास्टिक आढळुन आले. या सर्व दुकानदारांकडुन दंड वसुल करण्यात आला असुन दुकानात पुन्हा प्लास्टिक आढळल्यास पोलीस तक्रार करण्याची सक्त ताकीद देण्यात आली आहे. प्लास्टिक बंदीसाठी मनपा मार्फत " उपद्रव शोध पथक " ( NDS ) तयार करण्यात आले असुन सदर पथकाद्वारे पालिका क्षेत्रातील सर्व प्रतिष्ठाने, दुकानांवर कारवाई सुरु आहे.दरम्यान प्लास्टिक पिशव्यांची माहीती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असुन दिलेली माहीती खरी निघाल्यास ५ हजारांचे बक्षिस दिल्या जाणार आहे.

एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंचे उत्पादन, आयात, साठवणूक, वाहतूक, वितरण, विक्री व वापरावर राज्यात १ जुलै २०२२ पासून पूर्णपणे बंदी घालण्यात आली असुन महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल अधिसूचना २०१८ नुसार पाचशे रुपये जागेवरच दंड, संस्थात्मक पातळीवर ५ हजार रुपयांपर्यंत दंड,दुसऱ्यांदा वापर केल्यास १० हजार रुपये, तर तिसऱ्यांदा गुन्हा केला तर २५ हजार रुपये दंड आणि ३ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा आहे. चंद्रपूर महानगरपालिका हद्दीत प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर प्रतिबंध घालण्यास दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांनी दिलेले असुन प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियमाअंतर्गत मनपाच्या तीनही झोननिहाय कारवाईत संयुक्तपणे मोहीम राबवून शहरातील व्यवसाय प्रतिष्ठाने, दुकाने यांची कसून तपासणी करण्यात येत आहे. सदर कारवाई आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त मंगेश खवले यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात डॉ.अमोल शेळके यांच्या उपस्थितीत महेंद्र हजारे,भूपेश गोठे, प्रदीप मडावी व उपद्रव शोध पथकाद्वारे करण्यात आली.

# लोणंदच्या हिमालय फाऊंडेशनकडून वारीत आरोग्य सेवा

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा हा दोन दिवस लोणंद (ता.खंडाळा) मुक्कामी होता. या पालखी काळात अनेकांकडून वारकऱ्यांची सेवा करण्यात आली. पोलीस प्रशासना कडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जे पोलीस प्रशासन दिवस रात्र झटून पालखी सोहळ्यात नियोजन करत होते. त्या पोलीस प्रशासनाच्या आरोग्याची विशेष काळजी करणाऱ्या अनोख्या सेवा कार्यास हाती घेण्यात आले होते. लोणंदच्या या वारीत हिमालय फोंडेशनकडून सातारा जिल्हा पोलीस प्रशासन आणि लोणंद पोलीस प्रशासन यांना मास्क आणि प्रथमोपचारचे किट वाटप करीत आरोग्य सेवा देण्यात आली. हिमालय फौंडेशनकडून ५५० चे मास्क वाटप करण्यात आले. डीवायएसपी शेंडगे मॅडम यांच्या कडे सहा प्रथोमपचार किट देण्यात आली.या किट मध्ये बँडेज, मास्क, तापाची, पित्ताची, उलटीची गोळी तसेच खोकल्या साठी असणारा अडूळसा, जखमेची पावडर, क्रिम, जुलाब गोळी आदी साहित्य देण्यात आले. हिमालय फौंडेशन च्या अध्यक्षा डॉ.माधुरी जाधव, सचिव जाविद पटेल, जयंत कुलकर्णी डॉ.दिपेन्द्र कोकरे, मोहम्मद मुल्ला, सत्यजीत शानबाग, डॉ.प्रज्ञेश गोरड,नवाब चौधरी आदींसह इतर नागरीक उपस्थित होते. सातारा जिल्हा पोलीस प्रशासन तसेच लोणंद पोलीस प्रशासन दिवसरात्र अविरत काम करत आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व उपयुक्त गोष्टी करत आहेत.त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आम्ही हा आरोग्यदायी उपक्रम घेतला असल्याचे हिमालय फोंडेशनकडून सांगण्यात आले.हिमालय फोंडेशनने लोणंद पोलीस स्टेशनचे सुशिल भोसले यांच्या सुचने नुसार योग्य पद्धतीने प्रथोमपचार किट बनवण्यात आले होते. हिमालय फोंडेशनने पोलीस प्रशासनाने मास्क आणि प्रथोमपचार किट दिल्या बद्दल पोलीस प्रशासनाने हिमालय फोंडेशनचे आभार मानले आहेत.

# इंदिराबाई ललवाणी विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'मेरी लाईफ'उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**जामनेर :** केंद्र शासनाच्या आदेशान्वये इको क्लब फॉर मिशन लाईफ, यात आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारणे, शाश्वत अन्नप्रणाली स्वीकारणे, ई कचरा कमी करणे, कचरा कमी करणे, ऊर्जा बचत, पाणीबचत, प्लास्टिकचा वापर टाळणे आदी. ७ थीम अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने दि .१०/७/२०२४ रोजी "मेरी लाईफ" हा उपक्रम जामनेरपुरा येथील इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि. १ ते १० जुलै दरम्यान विद्यालयात आयोजन करण्यात आले. इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्यदायी जीवन शैली स्वीकारणे याबद्दल मार्गदर्शन प्रा.दिनेश महाजन यांनी तर शाश्वत अन्न प्रणाली स्वीकारणे याबाबत मार्गदर्शन प्रा.राजश्री पाटील यांनी, तर पाणी बचत या विषयावर मार्गदर्शन प्रा.विजेता परदेशी, प्लास्टिकचा वापर टाळणे याबद्दल मार्गदर्शन प्रा.सुमित काबरे, ई कचरा कमी करणे याबाबत मार्गदर्शन प्रा.सचिन गडाख, कचरा कमी करणे आपला परिसर स्वच्छ ठेवणे याबद्दल मार्गदर्शन क्रीडा शिक्षक प्रा.समीर घोडेस्वार यांनी केले.या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक एस आर चव्हाण, उपमुख्याध्यापक एस एन चवरे, उपप्राचार्य प्रा.के एन मराठे, पर्यवेक्षक प्रा.के.डी निमगडे, पर्यवेक्षक प्रा.जी जी अत्तरदे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले तर मेरी लाईफ उपक्रमाचे फिल्ड ऑफिसर प्रा.दिनेश महाजन, प्रा.संजय क्षिरसागर, प्रा.हर्षा दहीलेकर, प्रा.सविता महाजन, प्रा.माधुरी महाजन, प्रा.वैशाली पाटील, प्रा.सुमित काबरे, प्रा.सोनूसिंग पाटील, प्रा.समीर घोडेस्वार आदी.परिश्रम घेतले व सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे सहकार्य लाभले "मेरी लाईफ" अंतर्गत उपप्राचार्य प्रा.के एन मराठे यांच्या हस्ते वृक्षारोपण करताना सोबत पर्यवेक्षक प्रा. के डी निमगडे, फिल्ड ऑफिसर प्रा.दिनेश महाजन, प्रा.सोनूसिंग पाटील, क्रीडा शिक्षक प्रा.समीर घोडेस्वार व शिक्षकवृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खान्देशचे प्रसिद्ध गायक बिलाल तडवी यांची महाराष्ट्र प्रदेश संघटकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर येथे दिनांक ७/ ७/ २०२४ रोजी फर्दापुर येथे शासकीय विश्राम गृह येथे महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद तर्फे बैठक संपन्न .येना-या ९ आगस्ट जागतिक आदिवासी दिना संदर्भामधे आदिवासी समाजाची बैठक पार पडली या बैठकी मधे असे ठरविण्यात आले की येनारा ९ आगस्ट जागतिक आदिवासी दिन हा सिल्लोड येथे ९ आगस्ट रोजी साजरा करण्यात येनार असल्याचे ठरविण्यातआले आणी या कार्यक्रमामधे मोठ्या उपस्थित राहण्याचे अवाहन करण्यात आले आहे या आयोजित बैठक कार्यक्रमादरम्यान खांदेश विभागाचे प्रख्यात गायक बिलाल तडवी यांना महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद या संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक पदी निवड करुन नियुक्ती पत्र देऊन प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी, प्रदेश उप अध्यक्ष जब्बार तडवी,सल्लागार समीर तडवी, सरदार तडवी,यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले गायक बिलाल तडवी हे आदिवासी भिलाऊ गीते तसेच अहिरानी गिते तसेच हिंदी मराठी गित गानारे खांदेशी प्रसिद्ध गायक आहे बिलाल तडवी यांना राष्ट्रपती यांच्या हस्ते पुरस्कार सुध्दा मिळालेला आहे या आदिवासी समाजाच्या बैठकी दरम्यान प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी, प्रदेश उप अध्यक्ष तथा पत्रकार जब्बार तडवी, प्रदेश सल्लागार समीर तडवी, शिक्षक सरदार तडवी, बिलाल तडवी, विशाल बोराडे, नितीन तायडे, अफसर तडवी, जाफर तडवी, आमद तडवी, शेरखा तडवी, युसुफ तडवी सुलतान तडवी, समिर तडवी, गफ्फार तडवी, प्रकाश सुरडकर, सलिम तडवी, सत्तार तडवी, फिरोज तडवी, मजीत तडवी, मिनाबाई तडवी, राशदबाई तडवी, दगडु तडवी, ईतबार तडवी, मनोज तडवी, फारुख तडवी, राजु तडवी, सांडु तडवी, अमन तडवी, रफीक तडवी, शहारुख तडवी, सादीक तडवी व इतर शेकडो आदिवासी बंधु भगिनी व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते, अशी माहिती एन टिव्हीचे छत्रपती संभाजीनगरचे पत्रकार जब्बार डी तडवी यांनी बोलताना सांगितले.



# पालकमंत्र्यांच्या पुढाकारामुळे ‘बामणी प्रोटीन्स’

## मुख्यमंत्र्यांसोबत मुंबईत बैठक : कामगारांनी मानले पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ‘महाराष्ट्राचे सरकार गतिशील आणि कृतिशील आहे, काळजी करू नका, तुमची कंपनी सुरु होईल’, असे आश्वासन कामगारांना देत बल्लारपूर बामणी प्रोटीन्स कंपनीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यशस्वी तोडगा काढला. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कंपनीच्या संचालकांशी चर्चा केली. तसेच आवश्यक बाबींची पूर्तता करून कंपनी सुरु करण्याच्या सूचना कंपनी संचालकांना दिल्या. लवकरच सदर कंपनीला अपेक्षित लेखी पत्र देवून ही कार्यवाही पूर्ण होईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यानी दिले. चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कामगारांना दिलेले आश्वासन पूर्ण केल्याने तसेच सकारात्मक चर्चा झाल्याने कामगारांनी श्री. मुनगंटीवार यांचे आभार मानले. कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन कंपनी पुन्हा सुरू करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत आणि यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मुंबई येथे बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल, असे आश्वास जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर बामणी प्रोटीन्स येथील भारतीय केमिकल वर्कर युनियनच्या कामगारांना दिले होते. गत मार्च महिन्यापासून बंद असलेल्या बामणी प्रोटीन्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या ठिय्या आंदोलन मंडपाला श्री. मुनगंटीवार यांनी नुकतीच भेट देऊन कामगारांची विचारपूसही केली होती.

मंगळवारी विधानभवन येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कामगारांचे म्हणणे मुख्यमंत्री शिंदे यांनी ऐकून घेतले.

पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी विषयाचे गांभीर्य आणि पार्श्वभूमी सांगत हा 1 हजार कुटुंबाचा प्रश्न असल्याचे सांगितले. केरळ सरकारकडून संचालित या कंपनीच्या "डिस्चार्ज वॉटर" चा प्रश्न महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आलेल्या मार्गदर्शक सूचना आणि जिल्हाधिकारी चंद्रपूर यांची भुमिका त्यांनी विषद केली.

मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी सर्वच अधिकाऱ्यांना यातून सकारात्मक तोडगा काढून कामगारांना न्याय मिळावा यादृष्टीने मार्ग काढण्याच्या सूचना दिल्या. या चर्चेत कंपनीच्या वरिष्ठ संचालकांशी मुख्यमंत्र्यांनी थेट चर्चा करून मार्ग काढण्याचे आवाहन केले. महाराष्ट्र शासन यासाठी पूर्णपणे सहकार्य करेल, अशी आश्वासन देखील कंपनीच्या संचालकांना दिले. यावर कंपनीने मुख्यमंत्र्यांच्या सुचनेचा सन्मान ठेवत, महाराष्ट्र शासनाकडून या संबंधी आवश्यक पत्र व्यवहार झाल्यानंतर कंपनीच्या बोर्ड मीटिंग मध्ये प्रस्ताव ठेवण्यात येईल व नंतर कंपनी सुरु करण्याबाबत सुतोवाच केले.

सदर बैठकीला भारतीय केमिकल वर्कर युनियनचे बामणी प्रोटीन्स अध्यक्ष देवराव नींदेकर व त्यांचे प्रतिनिधी, बामणी प्रोटीन्स कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव इकबालसिंग चहल, विकास खारगे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश ढाकणे, कामगार विभागाच्या सचिव विनीता सिंघल, कामगार आयुक्त आदी उपस्थित होते.






# महायुतीनेच मराठा-ओबीसी समाजात तेढ निर्माण केली

## पितळ उघडे पडेल म्हणून महायुतीचा थयथयाट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा आणि ओबीसी समाजात महायुतीने तेढ निर्माण केले आहे. आरक्षणाचा प्रश्न या सरकारला सोडवायचा नाही. हे आता स्पष्ट झाले आहे. सरकारने सभागृहात भूमीका स्पष्ट करणे अपेक्षित आहे. त्यामुळे जनतेला आरक्षणाबाबतची माहिती मिळू शकते. परंतु सरकारला जनतेला अंधारात ठेवायचे आहे. म्हणून आरक्षण प्रश्नावर सरकार सभागृहात बोलत नाही. खरं तर आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याची या सरकारची इच्छाशक्ती नाही. त्यामुळे महायुतीने सत्तेतून बाहेर पडावे, अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे. वडेट्टीवार म्हणाले, सरकारने आंदोलकांना काय आश्वासन दिले हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना सांगितले नाही. मुख्यमंत्री अधिवेशन सुरू असताना आरक्षणप्रश्नी बैठक बोलावतात. त्यापेक्षा त्यांनी भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांना आम्ही वाचा फोडत आहोत. त्यामुळे गोंधळ घालून काम बंद पाडण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. महायुतीचे पितळ उघडे पडेल या भीतीने महाविकास आघाडीच्या नेत्यांना बोलू दिले जात नाही. अपयश लपवण्यासाठी सरकारचा हा थयथयाट सुरू आहे. महायुतीत 200 च्यावर आमदार आहेत. तरी देखील आरक्षाचा प्रश्न महायुती सरकार सोडवत नाही. उलट सभागृहात गोंधळ घालून कामकाज बंद पाडले जात आहे. विरोधी पक्षाला सभागृहात बोलू दिले जात नाही.

# मयत शेतकऱ्यांच्या वारसांना पीक कर्ज योजनांचा लाभ मिळालाच नाही : नागनाथ माळगे

## धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांच्या वारसांकडून संताप

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने कर्जमाफी योजना जाहीर केली होती योजनेचा अंमलबजावणी करिता ठेवण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे तालुक्यातील काही शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही विशेष म्हणजे सुरुवातीलाही प्रकरणे आधार प्रमाणीकरणामुळे अडकली असल्याचे बँकेच्या व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले होते यापैकी अनेकांनी आधार प्रमानीकरण करूनही योजनेचा लाभ मिळत नसल्याने नेमकी आडकाडी का व कशासाठी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे  नवीन सरकार आले.मुखमंत्री साहेबांनी या विषया कडे लक्ष घालुन मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा अशी धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांच्या वारसांकडून मागणी होतं आहे. मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे तालुक्यातील भारतीय स्टेट बँक शाखा धर्माबाद व शाखा येताळा जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा धर्माबाद व शाखा करखेली, महाराष्ट्र बँक धर्माबाद, शाखा धर्माबाद, शाखा करखेली, महाराष्ट्र बँक धर्माबाद व शाखा धर्माबाद बँक ऑफ बडोदा, करखेली  शाखा ,इत्यादी बँकेच्या माध्यमातून 52 गावातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाची जबाबदारी देण्यात आली तालुक्यात उपरोक्त बँकेच्या वतीने प्रत्येक शाखेतील काही खातेदारांचे त्यांच्या कर्जमाफी योजनेत समावेश झाल्याचा मेसेज आला पण प्रत्यक्षात कर्जमाफी मिळाली नाही किंवा नव्याने पीक कर्ज मिळाले नाही योजना सुरू होऊन  देखील पाच वर्ष संपले तरी कर्जमाफीचा लाभ मिळत नसेल तर नेमक्या अडचणी काय ? हे तरी कळवा व   मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांतून  होत आहे आता राज्यातील सरकारमध्ये बदल झाला असून पूर्वीच्या सरकारने जाहीर केलेल्या या कर्जमाफी योजनेचा लाभ पाच वर्षापासून अनेक लाभार्थ्यांना मिळालाच  नाही .  मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळेल का ? सदरील शेतकरी उपरोक्त योजनेचा लाभ घेण्यासाठी वंचित राहिले तर दोष कुणाचा असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित आज घडीला राहिलेला आहे तालुक्यातील कुटुंब प्रमुख असलेल्या शेतकऱ्यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या वारसा कडून मृत्यू प्रमाणपत्र व आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यात आली मात्र अशा या शेतकऱ्यांना अद्यापही पीक कर्ज योजनेचा लाभ मिळाला नाही तसेच नव्याने पीक कर्ज मिळाले नाही तसेच नव्याने पीक कर्ज मिळाले नाही यात नेमकी अडचण काय याची सहानिशा करून शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देत नवीन पीक कर्ज वाटपाचे काम त्वरित करावे. मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांचे वारसदार यानी तहसील कार्यालय व एसडीओ कार्यालय व पोलीस स्टेशन व निबंध कार्यालय व तालुका कृषी कार्यालय येथे निवेदन देण्यात आले होते व उपोषण देखील तहसील कार्यालय येथे  नागनाथ पाटील माळगे यानी आमरण उपोषण केले होते . पण आमरण उपोषण बसल्यानंतर तहसीलदार साहेबांनी लवकरात लवकर मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून देण्यात येईल असा पत्र दिल्यानंतर उपोषण उठवण्यात आले पण अद्याप पाच वर्ष होत आहेत तरी पण मयत शेतकऱ्यांच्या वारसांना नवीन पीक कर्ज मिळाले नाही व त्यांना न्याय मिळाला नाही तरी गतिमान शासनाने लवकरात लवकर मयत शेतकऱ्यांचे 2019 मध्ये महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती मध्ये मयत शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले असून शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा अशी धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांच्या वारसा कडून मागणी होत आहे.

> मयत शेतकऱ्यांच्या वारसांच्या शासनाने खात्यामध्ये मात्र अद्यापही रक्कम शासनाने जमा न केल्यामुळे जमा न झाल्याने मयत शेतकऱ्यांचे वारसदार आर्थिक दृष्ट्या हैराण झाले आहेत महाविकास आघाडीच्या सरकारने घोषणा करून देखील पाच वर्षे उलटले तरी नवीन सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करून मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा . धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांचे 2019 मध्ये शासनाने महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती मध्ये कर्ज माफ केले होते पण अद्याप शासनाने त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा न केल्यामुळे जशास तसे त्यांचे कर्ज दाखवत असल्यामुळे त्यांना नवीन पीक कर्ज मिळत नाही तरी शासनाने लवकरात लवकर त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा करावे व नवीन पीक कर्ज मिळवून द्यावे अशी मागणी धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांच्या वारसा कडून मागणी होत आहे .

# खंडाळा येथे सरपंच अन्नपूर्णा चव्हाण यांच्या प्रयत्नातून वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** खंडाळा येथे आज सकाळी ठीक  १०:१५ मिनिटांनी गावामध्ये सरपंच सौ अन्नपूर्णा ताई चव्हाण ,तसेच तलाठी आप्पा गोराडे साहेब,  कृषी सहाय्यक एन बी वैद्य, ग्रामसेवक आर डी साखळी, सदस्य कैलास चव्हाण, प्रतिष्ठित शेतकरी किशोर चव्हाण, पंढरीनाथ चव्हाण ,दादाराव खंडू चव्हाण, आदी ग्रामस्थ व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत. नागरिकांमध्ये वृक्ष लागवडीविषयी उत्साह वाढावा, वृक्ष लागवडीचे महत्व वाढावे, वृक्ष लागवड कार्यक्रमात लोकसहभाग वाढावा म्हणून शाळेपासून ते पूर्ण गावामध्ये दिंडी काढण्यात आली आहे, गावातील मंदिर ,ग्रामपंचायत कार्यालय, सरकारी दवाखाना, शाळा, या ठिकाणी वृक्षरोपण करून दिंडीचा समारोप समारोप करण्यात आला, नागरिक, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या दिंडीत सहभागी व्हावे असे आव्हान गोराडे आप्पा यांनी केले होते. त्यांच्या विनंतीला मान देऊन गावातील सर्व हजर राहिले व वृक्ष दिंडीला चांगला प्रतिसाद गावातून मिळाला प्रत्येकाने आपापल्या दारासमोर एक झाड लावावे व ते झाड नुसतेच लावायचे नाही तर त्या झाडाची जोपासना आपल्याला करायची आवाहन ग्रामस्थांना तलाठी आप्पा गोराडे यांनी बोलताना सांगितले.

# पुणे रिंग रोडचे काम किती दिवसांत पूर्ण करणार : वडेट्टीवार

## विरार-अलिबाग कॉरीडॉर, पुणे रिंग रोड प्रकल्पात भूसंपादनातील गैरव्यवहाराची चौकशी करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विरार-अलिबाग कॉरीडर आणि पुणे रिंग रोड प्रकल्पातील भूसंपादनात गैरव्यवहार झाला आहे. वसई-विरार भूसंपादनात देखील गैरव्यवहार झाला आहे. या दोन्ही गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करावी. तसेच हा गैरव्यहार करणाऱ्या भूसंपादन अधिकाऱ्याची चौकशी करून त्यास तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली आहे.

वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी लक्षवेधी मांडली होती. या लक्षवेधीवरील चर्चेवेळी त्यांनी चौकशीची मागणी केली आहे.

वडेट्टीवावर म्हणाले की, कर्ज काढून घर बांधा असा नवीन पायंडा महाराष्ट्रात पडत आहे. राज्यशासन कर्ज काढून नवीन प्रकल्प उभारत आहे. राज्यात पायाभूत सुविधा झाल्या पाहिजेत.



परंतु या पायाभूत सुविधा सरकारला झेपतील तेवढ्याच करण्याची आवश्यकता होती. मात्र त्यापलीकडे काम सुरू आहे. २०२१ च्या निर्णयानुसार जोपर्यंत जमिनीचे पूर्ण भूसंपादन होत नाही. तोपर्यंत निविदा प्रक्रिया अंतिम करता येत नाही. या निर्णयामुळे नियमांची पायमल्ली केली आहे. उत्तरात मंत्री म्हणाले की, ही निविदा २००९ च्या शासन निर्णयानुसार काढली आहे. २६ हजार ८३१ रुपयांचे हे काम होते. हे काम दोन वर्षात चाळीस हजार कोटींचे कसे झाले? हे पैसे कुणाच्या खिशात जात आहेत असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

वडेट्टीवार म्हणाले, कॅबिनेट नोट मध्ये वसई विरार ते अलिबाग कॉरीडॉरच्या भूसंपादनासाठी जी कर्जाची मान्यता घेतली त्यात प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी २२ हजार २५० कोटी रुपये हुडको कडून कर्ज रुपात घेण्यास मान्यता दिली. या कर्जासाठी जी शासन हमी देण्यात आली त्यात एकूण अकराशे तीस हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावयाचे होते. २१५.८० हेक्टर जमिनीचे भूसंपादन झाले आणि त्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी २३४१.७१ कोटी निधी देण्यात आला. एमएमआरडीए कडून एम.एस. डी.सी कडे आले. हे दोन्ही प्रकल्पचे भूसंपादन केल्याशिवाय कामाची निविदा काढू नये. या निविदा का काढण्यात आल्या त्याचे उत्तर द्यावे. या निविदा काढत असताना यात शंभर टक्के भूसंपादन होणार नाही यात खूप अडथळे आहेत. तरीपण निविदा काढून सरकार अधिकारी कमिशन घेऊन मोकळे झाले. सदर भूसंपादनामध्ये मुळशी पॅटर्न सारखी परिस्थिती होईल.

वसई विरार भूसंपादनाचा झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करावी. प्रांत अधिकाऱ्याने किमान दोनशे कोटी रुपये या सगळ्या प्रकरणात वसूल केले आहेत. ज्या जागा जिरायत नव्हत्या त्या जिरायत दाखवल्या. प्रांत अधिकाऱ्यावर किती दिवसात कारवाई करणार असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. हुडको कडून कर्ज घेण्याची घाई का केली. उर्वरित भूसंपादन किती कालावधीत करणार. हे करत असताना भूसंपादनअधिकाऱ्याची चौकशी करून त्याला निलंबित करा अशी मागणी विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी सभागृहात केली आहे.

# अकोल्यात भूकंपाचा धक्का

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** शहरामध्ये भूकंपाचा सौम्य धक्का बुधवारी सकाळी बसला आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात असला तरी शहरात अनेकांना हादरे जाणवले. त्यामुळे सकाळपासून नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. भूकंपाचे धक्के बसताच अनेक नागरिक घराबाहेर पडले. भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांसह विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये बुधवारी भूकंपाचे धक्के बसले. सकाळी ७.१४ वाजता अकोल्यासह नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यात भूकंपाचे धक्के बसले. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील रामेश्वर तांडा गावात आहे. त्याठिकाणी भूकंपाची तीव्रता रिष्टर स्केल वर ४.५ नोंदविण्यात आलेली आहे. दरम्यान, अकोल्यातील जुने शहर भागात सौम्य धक्का जाणवला. रामदासपेठ, जठारपेठ, गोरक्षण रोड आदी भागांमध्ये देखील भूकंपाचा धक्का जाणवल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. या भूकंपाच्या धक्क्यामध्ये जिल्ह्यात कोणतेही नुकसान झाले नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

अकोला शहरात अचानक भूकंपाचे हादरे जाणवल्याने नागरिकांमध्ये मात्र भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक जण समाज माध्यमांवर व्यक्त झाले. त्यांनी भूकंपाचे धक्का बसल्याचे म्हटले आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू अकोला जिल्ह्यात नाही. हिंगोली जिल्ह्यात केंद्रबिंदू नोंदवल्या गेला. शहरात कुणा-कुणाला भूकंपाचे धक्के जाणवले याची एकमेकांकडे विचारणा केली जात आहे. शहराच्या विविध भागात भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांनी सकाळीच घराबाहेर धाव घेतली होती. भूकंपाचे सौम्य धक्के असून त्याचा केंद्रबिंदू देखील हिंगोली जिल्ह्यात असल्याचे कळल्यावर नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. भूकंपाच्या धक्क्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये चांगलीच चर्चा रंगली आहे. अकोला जिल्ह्यात यापूर्वी मार्च महिन्यात देखील भूकंपाचे धक्के बसले होते. त्यावेळी केंद्रबिंदू देखील जिल्ह्यातच नोंदवल्या गेला होता. बाळापूर तालुक्यात अंत्री भागात २६ मार्च रोजी सायंकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली आदी जिल्ह्यांमध्ये भूकंप झाला होता. त्यामुळे अकोला जिल्ह्यात देखील भूकंप जाणवल्याची चर्चा नागरिकांमध्ये होती. मात्र, त्याची कुठलीही नोंद झाली नव्हती. २६ मार्चला सायंकाळी ६.२७ वाजता जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील अंत्री मलकापूर परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले.

# चिमठाणे गावात मूलभूत समस्यांचा महापूर; सरपंचांचे नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष

## गटारी, रस्ते नसल्याने नागरिकांचे प्रचंड हाल

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** शिंदखेडा तालुक्यातील चिमठाणे गावात गेल्या 3 वर्षांपासून दलित आदिवासी वस्तीमध्ये ना गटारीचे कामे करण्यात आली, ना रस्त्यांची त्यामुळे चिमठाणे गावातील ग्रामस्थ चांगलेच हैराण झाले आहेत. तीन वर्षापासून चिमठाणे ग्रामस्थ सरपंच छोट्याबाई दरबारसिंग गिरासे यांच्याकडे गटारी व रस्त्यांच्या मूलभूत प्रश्न करिता मागणी करीत आहे, मात्र सरपंच आणि त्यांचे पती व पुत्र या ग्रामस्थांच्या मूलभूत समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. चिमठाणे गावाच्या सरपंच छोट्याबाई दरबार सिंग गिरासे या तीन वर्षांपूर्वी गावाच्या सरपंच पदी विराजमान झाले मात्र गावाचा कारभार शिक्षण घेत असलेला त्यांचा मुलगा व चहाचे दुकान चालत असलेले त्यांचे पती दरबार सिंग गिरासे हेच बघतात. म्हणून नागरिक आपल्या समस्या घेऊन सरपंच पदी दरबार सिंग गिरासे यांच्याकडे जातात मात्र नागरिकांच्या कुठल्याच समस्या हे सोडवत नसल्यामुळे नागरिक चांगले हैराण आले आहेत. आता ऐन पावसाळ्यात गावातील पाणी हे दलित



वस्तीमध्ये शिरत असते त्यामुळे गटारी आणि रस्ते नसल्यामुळे हे पाणी तुंबते आणि याच तुंबलेल्या पाण्याचा त्रास नागरिकांना होत आहे. गावातील सांडपाणी हे गावातील वस्तीमध्ये साचल्यामुळे या साचलेल्या पाण्यामध्ये डुकर आणि इतर प्राणी यांच्यामुळे दुर्गंधी पसरत आहे तसेच डास मच्छरांमुळे नागरिकांचे व लहान बालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे सरपंचानी ग्रामस्थांच्या मूलभूत समस्येकडे लक्ष द्यावे.





# पक्षाने संधी दिल्यास प्रा. उत्तमकुमार कांबळे विधानसभा लढविणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** प्रा. उत्तमकुमार कांबळे हे गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक क्षेत्रात देगलुर - बिलोली विधानसभा मतदार संघात भरीव कार्य करीत असुन ते सध्याला भाजपा बुद्धिजीवी आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणून चांगले काम पार पाडीत आहेत. आतापर्यंत भाजप पक्षाने व संघटनेच्या वरीष्ठ नेतृत्वानी वेळोवळी दिलेली जबाबदारी निष्ठेने पुर्ण करीत आले आहेत. येत्या देगलूर-बिलोली विधानसभेसाठी पक्षाने मला संधी दिल्यास मी विधानसभेची निवडणूक लढविणार असल्याची माहिती प्रा. ऊतमकुमार कांबळे यांनी दि ७ जुले २०२४ रोजी बिलोली येथील शासकीय विश्रामगृह येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे. ते म्हणाले की मी २०१४ साला पासुन भारतीय जनता पक्षाचा एक प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून काम करित आहे. कोव्हीड-१९ च्या काळात अन्नधान्याची



किट वाटप करणे, रुग्णांची सेवा यासह इतर हि समाजपयोगी कामे निः शुल्क केले आहेत. मतदारांनी मला यावेळेस विधानसभेवर निवडून पाठविल्यास मी देगलुर - बिलोली तालुक्यातील मतदार संघातील महत्वाचे प्रलंबित कामे पूर्ण करु व तसेच तळणी येथील सिंचन प्रकल्प सुरु करणार, व देगलूर तालुक्यातिल जिनिंग च्या कर्मचा-यांची संख्या वाढविणार तसेच दोन्ही तालुक्यात नविन शैक्षणिक संस्था आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रा. कांबळे यांनी यावेळी सांगितले आहे .मी भाजप पक्षाकडे विधानसभेचे तिकिट मागणार आहे. पक्षाने मला यावेळेस संधी द्यावी अशी माझी इच्छा आहे. जर पक्षाने मला तिकीट नाही दिल्यास शेवटीं मी कोणत्यातरी पक्षांचा तिकिट घेऊन मी येणारी निवडणूक लढवणारच असे प्रा. कांबळे यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे. यामुळे पक्षाच्या इच्छुक प्रस्थापिताचे धाबे दणाणले असून प्रा. उत्तमकुमार कांबळे यांच्या पाठिशी देगलुर - बिलोली मतदार संघात मोठा चाहता वर्ग असल्याने त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे. ते अनेक वर्षापासून देगलूर महाविद्यालय येथे प्राध्यापक म्हणून काम करीत असून सद्याला ते उपप्राचार्य या पदावर आहेत. कुठलेही काम त्यांचे पारदर्शक व निर्मळ असते त्यांचा स्वभाव नेहमी प्रेमळ व दयाळू असल्याने त्यांनी विधानसभा लढविल्यास त्यांच्या मागे विद्यार्थी मतदार संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याचे बोलले जात आहे. त्यांना विधानसभेची उमेदवारी मिळावी अशी अपेक्षा सामान्य मतदारांच्या मनात आहे हे विशेष बाब आहे.

# लोहा शहरातील व्यापाऱ्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध

## सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** शहरात मोंढा परिसरात दर मंगळवारी आठवडी बाजार भरत असतो, काल मंगळवार दिनांक ९ जुलै रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी मंगळवारच्या आठवडी बाजारामध्ये भाजीपाला विक्रेते व विविध छोटे- मोठ्या व्यापाऱ्यांच्या आठवडी बाजारा मध्ये प्रत्यक्ष भेटीगाठी घेऊन या व्यापाऱ्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन लोहा कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये आठवडी बाजारातील व शहरातील छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांची तातडीने बैठक घेऊन या सर्व व्यापाऱ्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन या समस्या सोडवण्यासाठी लोहा-कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय,कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे व लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून शासन स्तरावर या व्यापाऱ्यांच्या समस्यांचे प्राधान्याने लवकरात लवकर सोडवणूक करण्यासाठी मी सदैव कटिबद्ध असल्याचे यावेळी सौ.आशाताई शिंदे यांनी आठवडी बाजारातील व शहरातील छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांशी बोलताना आश्वासन दिले, यावेळी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सौ. आशाताई शिंदे यांचा शाल,श्रीफळ,पुष्पहार देऊन भव्य सत्कार करण्यात आला ,यावेळी लोहा खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार, बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, शेकापचे नांदेड ग्रामीण जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील शिंदे



हरबळकर, बाजार समितीचे सचिव आनंद पाटील घोरबांड, बोरगावचे सरपंच प्रतिनिधी पुंडलिक पाटील बोरगावकर, संचालक बंडू पाटील पवार, संचालक भाउराव कंधारे, पारडीचे माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळे, लोहा समन्वय समितीचे सदस्य सिद्धू पाटील वडजे, शेकाप लोहा तालुका अध्यक्ष नागेश पाटील हिलाल, सरपंच माधव पाटील अण्णकाडे, काबेगावचे सरपंच दुलेखान पठाण, चिंचोलीचे माजी सरपंच गोविंदराव पाटील जाधव, खांबेगावचे सरपंच संदीप पाटील पौळ, प्रसाद पाटील जाधव, धनाजी पाटील ढगे, सुभाष पाटील सूर्यवंशी, सचिन कल्याणकर सह लोहा आठवडी बाजारातील व शहरातील छोटे मोठे व्यापारीसह कार्यकर्ते, पदाधिकारी यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# दिघोडे गावाला रुग्णवाहिका भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** यमुना सामजिक संस्थेचे अध्यक्ष तथा इंदिरा काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष, महाविकास आघाडीचे तडफदार नेतृत्व, कामगारांचा बुलंद आवाज महेंद्रशेठ घरत यांच्या माध्यमातून दिघोडे गावासाठी रुग्णवाहिका भेट देवून नागरिकांच्या मुख्य अडचणी दूर करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले आहे. रविवारी हा दिमाखदार सोहळा दिघोडे ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थ मंडळ यांच्यावतीने हे आयोजन करण्यात आले होते. महेंद्र घरत यांनी ही दिलेली रुग्णवाहिका ही १३ वी भेट दिली असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

गावातील ग्रामस्थांच्या अडचणी म्हणजे आयत्या वेळी अचानक मोठ्या रुग्णालयात जाण्यासाठी रुग्णवाहिकेची गरज भासते. दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच किर्तीनिधी ठाकूर यांनी महेंद्र घरत यांच्या कानावर सदर बाब घातली असता महेन्द्रशेठ घरत यांनी क्षणाचाही विलंब न करता दिघोडे गावासाठी रुग्णवाहिका भेट म्हणून देण्याचे आश्वासन दिले. नुसते आश्वासन नाही तर रविवारी हे आश्वासन त्यांनी प्रत्यक्षात उतरविले.

सदर रुगणवाहिकेचे लोकार्पण महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मिलिंद पाडगावकर, अखलाख शिलोत्री, डॉ.मनीष पाटील, महेंद्र ठाकूर, विनोद म्हात्रे, १८ गाव कृती समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, न्यू मेरिटाईम जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष वैभव पाटील, सचिन घरत, माजी सरपंच अविनाश पाटील, विद्यमान सरपंच किर्तिनिधी ठाकूर, उपसरपंच अभिजित पाटील, कृष्णा पारिंगे, रेखा घरत आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

सामाजिक चळवळीची बांधीलकी जपण्याची शिकवण मला आई यमुना हिने दिली आहे. पक्षीय राजकारण न बघता रुग्णवाहिकेची सेवा पुरविण्यात जे समाधान आहे ते कशातच नाही, असेची महेंद्र घरत यांनी सांगताना आपले काम सेवेचे, कष्टकऱ्यांसाठीचे आहे हे कायम लक्षात ठेवा. लोकांचे काम होणे महत्वाचे आहे, असेही त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन करताना सांगितले.



# सामाजसेवेने मनाला वेगळा आनंद मिळतो

## जिल्हा न्यायधीश एम .एस. शेख

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** न्याय दानाचे काम करीत सामाजिक सेवा केल्याने मनाला वेगळा आनंद मिळतो आहे.याच मूळहेतुनी प्रेरीत होऊन स्वताला विधायक कामात झोकून दिल आहे. भविष्यात अशीच समाजाची मनोभावे सेवा करण्याचा संकल्प केला आहे. अशी माहिती श्रीगोंदा येथील जिल्हा न्यायमुर्ती एम.एस.शेख यांनी दिली आहे.

येथील शासकीय विश्रामगृहात त्यांनी तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवराशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. श्री.शेख म्हणाले की,भोकर येथे न्यायमुर्ती म्हणून काम करीत असताना समाजाचं काही देणं लागतो म्हणून सामाजीक कार्याला सुरुवात केली आहे.पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातील शासकीय,निमशासकीय व्यक्ती,स्वंयसेवीसंस्था, पत्रकारांनी मला स्वयंस्फुर्तीने साथ दिल्याने हे शक्य झालं आहे.

तळागाळातील सर्व सामान्य लोकांना कायद्याची माहिती व्हावी म्हणून जनजागृती केली आहे.यावेळी विधी सेवा समितीने खांद्याला खांदा लावून निसंकोचपणे पुढाकार घेतला.कोरोना काळात अनेक लोकांना भोजनदान करून त्याची सेवा करता आली.गंभीर गून्ह्यातील आरोपींना फाशीची शिक्षा दिली आहे जेणे करून भविष्यात इतर गुन्हेगारांनी असे टोकाचं पाऊल उचलू नये म्हणून घेतलेला निर्णय होता. कायदा आणि सामाजिक बांधिलकी जोपासत केलेल काम आजही स्मरणात आहे.आज तेच कार्य श्रीगोंदा येथे सूरू आहे असे सांगितले.

# ग्रामीण वाहतुक पोलिसांची दंडात्मक कारवाई; वाहनधारकांसह प्रवाशांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मावसाळा -कागजीपूरा हिल पॉंईट मुख्य रस्त्यावर ग्रामीण वाहतूक पोलीसांनी अचानक विविध तपासणीच्या नावाखाली कारवाई सुरु केल्याने वाहनधारकांसह (दि.९) मंगळवारी दुपारी प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. पोलिसांनी हेल्मेट नसणे, बेल्ट न लावणे, ट्रीपल सिट, अवैध प्रवासी वाहतूक, ओव्हर लोड, विनापरवाना वाहन चालवणे आदि कागदपत्रे तपासणीच्या नावाखाली प्रथम खुलताबाद हाफीज चौक तद्नंतर मावसाळा-कागजीपूरा हिल पॉंईट मुख्य रस्त्यावर तपासणी सुरू केली हे करताना एक बाजू ऐवजी दोन्ही बाजूंनी वाहने थांबवत रहदारी गर्दी करताना दिसले. त्यामुळे अनेक वाहनधारकांना नाहक्क त्रास मनसंताप झाला. तर जे ओव्हर सिट असतील ते मागेच खाली उतरुन त्यांना पायी चालावे लागले येथे पॉंईटवर यात्रेचे स्वरूप आले होते. त्यात १४०दरम्यान वाहनधारकांवर पोलिसांनी कारवाई केली. तर जे वाहन थांबवून थांबत नव्हते त्यांचे मागुन फोटो घेण्यात आले तर कांहींचे विना कारण वाहन न थांबवता मागुन फोटो घेताना पोलिस दिसले. दौलताबाद,कागजीपूरा, खुलताबाद भद्रा मारुती जरजरीबक्ष ,म्हैसमाळ, वेरुळ लेणी घृष्णेश्वर मंदिर ही सर्व पर्यटन स्थळे ते पाहण्यासाठी नेहमीच पर्यटकांची प्रचंड गर्दी असते .यात हौसे गवसे नवसे यांचा सहभाग असतो प्रचंड गर्दी असताना दोन्ही बाजूंनी वाहने थांबवणे,ओळखीचे सोडून देने, अचानक कागदपत्रांची तपासणी करणे हे प्रकार प्रत्यक्ष दर्शनी नागरिकांकडून प्रतिनिधीला सांगण्यात आले. तर विना वाहन थांबवत फोटो का घेत आहे असे विचारल्यावर तो प्रकार थांबला. ग्रामीण वाहतूक पोलीस वाहनधारक नागरिकांना त्रास न व्हावे, मदत, सुरक्षा, मार्गदर्शन साठी आहे का? मुख्य रस्त्यावर त्रास देण्यासाठी असे सवाल प्रतिनिधी ला केले. यावर प्रतिनिधी ने पोलीसांना विचारणी केल्यावर त्यांनी बेशिस्ती वाहतुक , ओव्हरटेक, ओव्हर स्पीड याबाबत कारवाई करत असल्याचे सांगितले. यामुळे अनेक वाहनधारक प्रवाशी नागरिकांनी संताप व्यक्त केला. यासंदर्भात वरिष्ठाधिकारी यांनी लक्ष घालण्याची गरज आहे, अशी नागरिकांची मागणी आहे.



# 65 वर्षांवरील पात्र वृद्धांना मिळणार एकवेळ एकरकमी तीन हजार रुपये

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यातील 65 वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जिवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी तसेच वयोमानानुसार त्यांना येणारे अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साहित्य / उपकरणे खरेदी करणे, मनस्वास्थ केंद्र, योगापचार केंद्र आदींद्वारे वृध्दांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत 65 वर्षे व त्यावरील पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी 3 हजार रुपये देण्यात येणार आहे. योजनेचे स्वरुप : पात्र वृध्द लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता / दुर्बलतेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपाड स्टिक, व्हील चेयर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्व्हाइकल कॉलर इ. सहाय्यभूत आवश्यक सहाय्य साधने /उपकरणे खरेदी करणे तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजने अंतर्गत निधीचे वितरण ऑनलाईन पध्दतीने (महाडीबीटी) एकवेळ एकरकमी 3 हजार रुपयांच्या मर्यादेत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष : 1) लाभार्थी व्यक्ती राज्यातील ज्येष्ठ नागरिक (ज्या नागरिकांनी दि. 31 डिसेंबर 2023 पर्यंत वयाची 65 वर्षे पूर्ण केली असतील असे), ज्या व्यक्तींचे वय 65 वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधार कार्डसाठी अर्ज केलेला असावा व नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. जर लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसेल आणि स्वतंत्र ओळख दस्तऐवज असतील, तर ते ओळख पटविण्यासाठी स्वीकारार्ह असेल. 2) लाभार्थी पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड किंवा राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धपकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत किंवा राज्य/ केंद्रशासित सरकारच्या इतर कोणत्याही पेन्शन योजनेअंतर्गत वृद्धपकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याच्या पुरावा सादर करू शकतात. 3) सदर व्यक्तीने मागील 3 वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि कोणत्याही सरकारी स्त्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसावे. याबाबतचे लाभार्थ्यांने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. 4) पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तीक आधार संलग्न बचत खात्यात 3 हजार रुपये थेट लाभ वितरीत झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक प्रमाणपत्र 30 दिवसांच्या आत संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून प्रमाणित करावे. तसेच संबंधित प्रमाणपत्र विकसित पोर्टलवर 30 दिवसांच्या आत अपलोड करणे आवश्यक राहील. अन्यथा लाभार्थ्यांकडून सदर रक्कम वसूल करण्यात येईल. 5) निवड/ निश्चित केलेल्या जिल्हयात, लाभार्थ्यांच्या संख्येपैकी 30 टक्के महिला असतील. उत्पन्न मर्यादा : लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न 2 लाखाच्या आत असावे. याबाबतचे लाभार्थ्यांने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

# विश्वकर्मा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सत्कार सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** विश्वकर्मा सेवा संघ नांदेड च्यावतीने विश्वकर्मा समाजातील  गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सत्कार सोहळा दि. १४ जुलै २०२४ रोज रविवारी नांदेड शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड  येथे आयोजित करण्यात आला आहे. विश्वकर्मा समाजातील विद्यार्थी गुणवत्ता वाढावी समाजातील विद्यार्थी स्पर्धेच्या युगात अव्वल यावेत यासाठी दरवर्षी विश्वकर्मा सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन प्रेरणा व मान्यवरांकडून योग्य दिशादर्शक मार्गदर्शन या सोहळ्याच्या माध्यमातून दिले जाते. नांदेड जिल्ह्यातील खेड्यापाड्यातील गुणवंत विद्यार्थी शेकडोंच्या संख्येने दरवर्षी यासोहळ्यासाठी उपस्थित राहतात. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नागनाथराव पांचाळ ढोलउमरीकर, तर उदघाटक  आमदार डॉ. संजय रायमुलकर, मेहकर जि. बुलढाणा हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण महाराज कपाटे, भोकर, वसंत पांचाळ रातोळीकर, श्री विठ्ठलराव पांचाळ, बाबुराव पांचाळ हे असणार आहेत. याचसोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांना शिल्पकार गुरुवर्य सोपानकाका शूर दहावी १-बारावी १ प्रथम दोन गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५५०० /- शिष्यवृत्ती, कै.धोंडिबाराव नागोबा पोलादवार शिष्यवृत्ती दहावी १-बारावी१ द्वितीय दोन विद्यार्थ्यांना प्रत्येकी  २५००/- रुपये व याचारही विद्यार्थ्यांना कै. लक्ष्मणराव शिवलिंगराव देशमुख अंबुलगेकर यांच्या स्मरणार्थ स्कुलबॅग भेट देण्यात येणार आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये सत्कार पात्र विद्यार्थी दहावी उत्तीर्ण ७५% व त्यापेक्षा अधिक गुणवत्ता धारक, बारावी ७०% व  त्यापेक्षा अधिक गुणवत्ता धारक, युपीएससी निवड विद्यार्थी २०२४, एमपीएससी निवड विद्यार्थी २०२४, MBBS व BAMS निवड विद्यार्थी २०२४, इंजिनिअरिंग निवड विद्यार्थी २०२४ असणार आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी यासाठी नोंदणीसुध्दा केली आहे. यासत्कार सोहळ्यात सहभागी होण्यासाठी गुणपत्रिकेसह उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. समाजासाठी व मानव कल्याणासाठी विशेष योगदान येणाऱ्या व्यक्तींना 'समाजभूषण पुरस्कार' तर अत्यंत कठीण परिस्थितीत पतीच्या अकाली निधनानंतर आपल्या मुलांना शिक्षण, कला, क्रीडा, उद्योग, व्यापार व राजकीय क्षेत्रात उत्तुंग झेप घेण्यासाठी सक्षम बनवणाऱ्या समाजातील आदर्श मातांना 'हिरकणी पुरस्कार' देऊन यासोहळ्यात गौरविण्यात करण्यात येणार आहे. यासोहळ्यासाठी विश्वकर्मा समाजातील अधिकाधिक समाजबांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन  विश्वकर्मा सेवा संघ तालुका लोहा च्या वतीने करण्यात आले आहे.



# अण्णा भाऊ साठे जयंती अध्यक्षपदी श्याम दाढेल

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती सोहळा लोहा शहरात मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. जयंती महोत्सव समिती निवडीसाठी  साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पूर्णाकृती पुतळा समितीचे संस्थापकीय अध्यक्ष पांडुरंग दाढेल यांच्या मार्गदर्शनाखाली या जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी श्याम संतराम दाढेल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच सर्व सदस्यांची सुद्धा निवड करण्यात आली, उपाध्यक्ष करण सोमनाथ सावळे, सचिव गोविंदा अशोक कंधारे, कोषाध्यक्ष नितेश गंगाराम वाघमारे, सल्लागार पिराजी भुजंगा कंधारे, प्रसिद्धी प्रमुख विनोद महाबळे, सदस्य चंद्रकांत घनश्याम जाधव, बबन राम सरोदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी या बैठकीस माजी नगरसेवक अनिल दाढेल, प्रवीण महाबळे, साहेबराव हरगावकर, कृउबा समितीचे संचालक सुभाष खंदारे, संदीप सावळे, मिलिंद वाघमारे, सुधाकर कांबळे,संदीप खुणे, नागन दाढेल, पुंडलिक दाढेल, चंद्रकांत धोंगडे, गणेश दाढेल, अमोल दाढेल, अविनाश दाढेल, भारत दाढेल, शिवचरण दाढेल, संदीप सावळे, चांदू हजारे, सुदाम लोंढे आदींसह मातंग समाज बांधव उपस्थित होते.

# दोन जहाल नक्षलवाद्यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** खून, जाळपोळ, चकमकीसह स्फोट घडवून सुरक्षा यंत्रणावर हल्ला करणाऱ्या दोन जहाल नक्षलवाद्यांना जेरबंद करण्यात पोलिसांना ९ जुलै रोजी यश आले. भामरागड तालुक्यातील धोडराजच्या घनदाट जंगलात अटक केलेल्या या दोन नक्षलवाद्यांवर शासनाचे दहा लाखांचे बक्षीस होते. नक्षलवादी चळवळीत ॲक्शन टीम कमांडर पदावर काम करणारा रवि मुरा पल्लो (३३,रा. कवंडे ता. भामरागड), भामरागड दलम सदस्य  दोबा कोरके वड्डे अशी त्यांची नावे आहेत. रविवर ८ लाखांचे तर दोबावर महाराष्ट्र शासनाचे दोन लाखांचे बक्षीस होते. धोडराज हद्दीतील जंगल परिसरामध्ये विशेष अभियान पथक  जवान नक्षलवादविरोधी अभियान राबवित होते. यावेळी दोन संशयित नक्षलवादी धोडराज ठाणे हद्दीत घातपात करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची माहिती मिळाल्यावरुन सापळा रचून जंगलातून त्यांना अटक केली.  नोव्हेंबर २०२३ मध्ये पेनगुंडा येथे एका निरपराध व्यक्तीची हत्या झाली होती. यात त्या दोघांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली.



# पीक विमा कर्मचारी कृषि विभागातच बसविला

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शेतकरी दरवर्षी पिक विमा काढतात आणि झालेल्या नुकसानाची कंपनीला माहिती दिल्यानंतर कंपनी प्रतिनिधी पंचनामे करून जातात. याखेरीज शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगाच्या आधारे सुद्धा विमा दिला जातो .परंतु बऱ्याच शेतकऱ्यांना विमा त्यांच्या खात्यावर आला नाही आला तर किती आला कोणत्या खात्यात जमा झाला कधी जमा झाला याची सर्व माहिती मिळण्यासाठी पिक विमा कंपनीचे कार्यालय प्रत्येक तालुक्यात आहे. फुलंब्री तालुक्यात चोलामंडलम जनरल इन्शुरन्स कंपनीने मागच्या वर्षी विमा कंपनी म्हणून काम केले असून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर व्हाव्या याकरता तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी कंपनी प्रतिनिधीला तालुका कृषी अधिकारी कार्यालयातच बसण्यास ऑफिस उपलब्ध करून दिले आहे. सदर पिक विमा ऑफिसचे बुधवारी निमखेडा येथील शेतकरी श्री नामदेव नारायण फुके यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले .शेतकऱ्यांच्या पिक विमा बाबत काही अडचणी असतील तर त्यांनी ऑनलाईन भरलेला फॉर्म व बँकेचे पासबुक घेऊन कृषी कार्यालयात विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यास संपर्क करावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी केले आहे.

# रीलसच्या नादात कार दुभाजकावर आदळली

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पार्टी केल्यानंतर कारने फेरफटका मारण्यासाठी निघालेल्या पाच मित्रांनी इंस्टाग्रामवर रिल्स बनवणे सुरू केले. रिल्सच्या नादात चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार दुभाजकावर आदळली. कार वेगात असल्यामुळे ८ ते १० वेळा उलटली. यात चालकासह दोघांचा मृत्यू झाला तर अन्य तिघे गंभीर जखमी झाले. हा अपघात मंगळवारी पहाटे तीन वाजता पांजरा येथील बीएसएनएलच्या कार्यालयाजवळ झाला. विक्रम गादे (२०, महादुला) आणि आदित्य पुण्यपवार (२०,चार्मोशी, गडचिरोली) अशी अपघातात ठार झालेल्यांची नावे आहेत. जखमींमध्ये जय संजय भोंगाडे, सुजल प्रमोद चव्हाण, सुजय राजन मानवटकर (सर्व राहणार महादुला, कोराडी) यांचा समावेश आहे. विक्रम गादे याच्या घरी पार्टी आयोजित करण्यात आली होती. पाचही जणांनी जेवण केल्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास फेरफटका मारण्यासाठी कार बाहेर काढली. रात्री अडीचच्या सुमारास पाचही मित्र कारने महादूल्याकडून नागपूरच्या दिशेने निघाले. गाडीत एक मित्र इंस्टाग्रामवर रिल्स बनवायला लागला. वेगाशी स्पर्धा करणाऱ्या कारमध्ये रिल्स बनविताना चालकानेही सहभाग घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, यादरम्यान कारवरील नियंत्रण सुटल्याने कार दुभाजकावर आदळली. हा अपघात पांजरा येथील बीएसएनएलच्या कार्यालयाजवळ झाला. अपघात एवढा भयानक होता की, कार महामार्गावरील सहा बॅरिकेड्स तोडून सर्व्हिस मार्गावर आदळली.   या अपघातात विक्रम गादे व आदित्य पुण्यपवार या दोघांचाही घटनास्थळी मृत्यू झाला.   कारमध्ये मासाचे व हाडांचे तुकडे पडले होते. या घटनेतील जखमींपैकी सुजल चव्हाण व सुजय मानवटकर यांना बोकारा येथील रुग्णालयात तर जय भोंगळे याला नागपूर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शिक्षक सेनेच्या वतीने वृक्षारोपण पंधरवडा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** झाडे लावा झाडे जगवा पर्यावरणाचा समतोल राखा हा संदेश शिक्षकसेनेच्या वतीने  देत शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षक सेनेचे प्रांतआध्यक्ष तथा शिक्षक आमदार मुंबई मा.ज.मो.अभ्यंकर यांच्या संकल्पनेतून (प्रेरणा दिन )वृक्षारोपण पंधरवडा साजरा करण्यात येणार असल्याची माहिती  महाराष्ट्र प्रदेश शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण यांनी दिली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे लाडके माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दि.13 ते 27 जुलै 2024 (प्रेरणा दिन) शिववृक्षारोपणाचा वृक्षारोपण पंधरवाडा महोत्सव साजरा करण्याचे महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेने ठरविले आहे.  महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना प्रांताध्यक्ष तथा शिक्षक आमदार  ज.मो. अभ्यंकर यांच्या संकल्पनेतून होणारा हा वृक्षारोपन प्रेरणा दिन राज्यातील सर्व विभागातील सर्व जिल्हे व तालुका स्तरावरील पदाधिकारी व सर्व शिक्षक सैनिक या वृक्षारोपण(प्रेरणा दिन) अभियानात सहभागी होऊन वृक्षारोपन  करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री  उध्दव ठाकरे  स्वतःनिसर्ग तथा वृक्षमित्र आहेत. सध्या दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून कुठे पाऊस जास्त तर कुठे पडत नाही म्हणुन नियमित पाऊस पडण्यासाठी आणि प्राणवायू मिळण्यासाठी,पर्यावरण संतुलित राहण्यासाठी वृक्षारोपण करणे नितांत आवश्यक आहे. दरवर्षी माजी मुख्यमंत्री ठाकरे यांच्या जन्म दिवसा निमित्त, लोहा शहर व तालुक्यासहीत राज्य मराठवाड्यासह,नांदेड जिल्ह्यात हजारो वृक्षांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात येते  शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे स्वतःपर्यावरण प्रेमी तथा वृक्षमित्र आसल्यामुळे यांचा वाढदिवस वृक्षारोपण पंधरावडा(प्रेरणा दिन)म्हणून साजरा करण्यात येत आहे. सदरील वृक्षरोपण उपक्रम  शाळा,महाविद्यालय,मोकळी जागा,शेतातील बांधावर,डोंगरमाथ्यावर,ग्राम पंचायत,नगरपालीका,महानगर पालीकेच्या मोकळ्या जागेत वृक्षारोपण केले जाते. दिनांक 13 ते 27 जुलै  2024 हे पंधरा दिवस हे वृक्षारोपण पंधरावाडा दिन (प्रेरणा दिन) म्हणुन साजरा होणार आहे.

# जवळा येथील दारूबंदीसाठी दिले महिलांनी निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** तालुक्यातील डोणगांव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम जवळा येथे दोन जण अवैध दारूचा व्यवसाय करीत असल्याने लहान मुलांसह युवक तसेच म्हातारे सुध्दा व्यसनाधीन होत आहेत. त्यामुळे जवळा येथील दारु त्वरीत बंद करा असे निवेदन जवळा येथील महीला व पुरुष यांनी दि. 9 जुलै ला डोणगांव पोलीस स्टेशन येथे येऊन दिले. त्यानी आपल्या निवेदनात , मौजे जवळा हद्दीत अनाधिकृतपणे देशी, विदेशी व गावराण दारु विक्रीचे दोन दुकाने असुन सदहु दुकानधारकाकडे दारु विकण्याचा शासनाचा कोणताही परवाना नसुन ते अनाधिकृतपणे दारु विक्री करीत आहेत त्यामुळे सामाजिक वातावरण खराब होत आहे. व अनेक लोकांचे संसार उध्दवस्त गावात दारुबंदी असतांनी विनापरवानगी दारु उपलब्ध करुन देवु जादा भावाने दारु विकल्या जात आहे त्यामुळे गावातील वयस्कर माणसांसोबतच वय १५ ते ३० या वयोगटातील युवा पिढी व्यसनाधिन होत आहे. यामुळे युवा पिढीचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे त्यांचे व त्यांच्या परिवारांचे पारीवारीक जिवन उध्दवस्त



होत आहे. एकंदरीतच अनाधिकृत देशी दारु दुकान विक्रीमुळे आमच्या जवळा येथिल सामाजिक एकोपा हा बिघडत आहे. सोबतच व्यसनी झालेल्या पुरुषांकडुन घरातील महिला आबालवृध्दांच्या जिवीत्वाला धोका होत आहे. तसेच त्या दारुच्या व्यसनामुळे दर दिवशी प्रत्येक घरामध्ये भांडणे होत आहेत त्यामुळे बऱ्याच जणांचे संसार उध्दवस्त होण्याच्या मार्गावर आहेत तसेच काही युवक दारु पिऊन सार्वजनिक ठिकाणी दादागिरी करणे विनाकारण सामाजिक कार्यामध्ये अडसर निर्माण करणे असे अनेक प्रकार गावामध्ये घडत आहेत. हे टाळण्यासाठी संबंधीत विभागाने व अधिकारी वर्गाने या निवेदनाची दखल घेऊन तात्काळ जवळा येथील अनाधिकृत दारुचे दुकान बंद करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी व गावातील सामाजिक एकोपा शांतता कायदा व सुव्यवस्था अबादित राहण्यासाठी मदत करावी व जर आपण या निवेदनाची दखल घेऊन येत्या १० दिवसामध्ये आम्हाला न्याय दिला नाही. तर गावातील सर्व महिला भगिनी तसेच पुरुष मंडळी यांच्या वतीने तिव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल याची दखल घ्यावी व आंदोलनादरम्यान काही जिवीत हाणी किंवा इतर नुकसान झाल्यास त्याला सर्वस्वी आपण संबधीत विभागाचे अधिकारी वर्ग जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.असे निवेदन दिले असून सदर निवेदनावर सौ दिपाली विजय खरात श्रीमती लताबाई खुशाल खरात सौ. अनिता रामेश्वर इरतकर किशोर वामन मोरे तथा सर्व गावकरी मंडळी जवळा च्या 300 जणांच्या सह्या आहेत.

## लेहा जहागीर उपसरपंचाचा दावा जिल्हा अधिकारी यांनी फेटाळला

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लेहा जहागीर येथील मागील काही दिवसांपूर्वी मौजे लेहा जहागीर येथील सरपंच व उपसरपंच यांच्याविरोधात सर्व सदस्यांनी अविश्वास ठराव मांडुन संमत करण्यात आला होता. याविरोधात उपसरपंच ज्ञानेश्वर निकम यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेले अपील हे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी फेटाळून लावले. सरपंच/उपसरपंच यांच्याविरुद्ध दाखल केलेला अविश्वास हा नियमानुसार व बहुमताने मंजूर झाल्यामुळे तो वैध आहे असा निर्वाळा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला. सदस्यांच्या वतीने ॲड. एन. बी. सोनवणे यांनी यशस्वी बाजू मांडली तसेच अर्जदार यांच्याकडून ॲड. राहुल यांनी कामकाज पाहीले.



## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अर्धनग्न आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष सन्मानीय राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने मनसे नेते बाळा नांदगावकर साहेब मनसे नेते दिलीप बापू धोत्रे शेतकरी नेते संतोष भाऊ नागरगोजे जिल्हा अध्यक्ष वैभवजी मिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. ०८/०७/२०२४ रोजी कन्नड तालुक्यातील ७१,१०० शेतकर्यांचे दावे फेटल्यामुळे पिक विमा कंपनीसह बेजबाबदार कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा या प्रमुख मागणीसह तहसील कार्यालया समोर अर्धनग्न आंदोलन सुरु करून पिकविमा कंपनी विरोधात ४ तास घोषणाबाजी करण्यात आले आणि झोपलेले प्रशासन जागी झाले त्यानंतर तहसीलदार विद्याचर कडवर साहेब, तालुका कृषि अधिकारी बाळराजें मुळीक साहेब यांनी आंदोलना ठिकाणी येऊन आंदोलनाची दाखल घेऊन दिनांक १० जुलै २०२४ पर्यंत पिकविमाची रक्कम संबंधित शेतकरी यांच्या खात्यात जमा करण्यात येईल तसेच चोलामंडल पिकविमा कंपनी व बेजबाबदार कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात असे लेखी आश्वासन तहसिलदार , कृषी अधिकारी यांनी दिले यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुका अध्यक्ष अनिल शेळके पाटील शहर अध्यक्ष शशांक महादाणे तालुका सचिव गोपालसिंग राजपूत तालुका संघटक शंकर मतसागर तालुका उपसंघटक सचिन शेजवळ तालुका उपाध्यक्ष अशोक पवार तालुका उपाध्यक्ष संतोष सोनावणे , तालुका उपाध्यक्ष सांडू सुरे तालुका उपाध्यक्ष अशोक जाधव शेतकरी सेना जिल्हा उपाध्यक्ष संतोष खेळवणे शेतकरी सेना तालुका अध्यक्ष संदिप देवरे शेतकरी सेना तालुका सचिव योगेश पवार सर्कल अध्यक्ष शरद मोरे , सर्कल अध्यक्ष कृष्णा जाधव महाराष्ट्र सैनिक सागर निमसे , योगेश पल्ह्टे विजय हाडोळे , अक्षय हाडोळे , प्रीतम देठे , कृष्णा अकोलकर ,संजय इंगळे , गणेश राठोड , शेषराव पवार, किसन जाधव , अनिल रमणे , रामेश्वर पवार , प्रविण पवार , किरण राठोड , निलेश चव्हाण , किरण जाधव, प्रल्हाद चव्हाण, जीवन राठोड , दादा भवर , पांडुरं चव्हाण , सचिन मोटे ,बंडू भवर , आदी पदाधिकारी उपस्थित होते .

## पुरात वाहून गेल्याने दांपत्याचा करुण अंत

आधुनिक केसरी न्यूज

बुलढाणाः पूर आलेल्या नदीत उतरणे मलकापूर तालुक्यातील एका प्रौढ दाम्पत्याच्या जीवावर बेतले! पुरात वाहून या दोघांचा करुण अंत झाला. यातील पतीचा मृतदेह आज बुधवारी ( दिनांक दहा) उत्तररात्री दूर अंतरावर आढळून आला.यामुळे देवधाबा गावासह मलकापूर तालुक्यात खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. विमल सुभाष शिंदे ( वय पन्नास) आणि शुभाष ब्रम्हा शिंदे( वय पंचावन्न) असे मृत जोडप्याची नावे आहे. विमलबाई या गावासह तालुक्यातील विविध गावांत सुया, पोथ, मणी, कंगवे, हार आदी 'कटलरी' विकण्याचा व्यवसाय करीत होत्या. काल मंगळवारी दिनांक नऊ) सुपारी विमालबाई शिंदे देवधाबा येथून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या हिंगणाकाझी( तालुका मलकापूर) या गावात गेल्या होत्या. पत्नीला वाचविण्याच्या प्रयत्नात गमावला जीवदरम्यान देवधाबा परिसरात जोरदार पाऊस पडत असल्याने सुभाष शिंदे हे पत्नी विमलबाईला आणण्यासासाठी दुचाकीने (मोटारसायकल ने) हिंगणा काझी येथे गेले.

## स्वप्नील जोशीचा चित्रपट 'बाई गं' उद्यापासून

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठी चित्रपटांमध्ये सातत्याने वेगळे प्रयोग करणारे दिग्दर्शक पांडुरंग जाधव यांचा नवा मराठी चित्रपट 'बाई गं' उद्या 12 जुलैपासून सर्वत्र प्रदर्शित होत आहे. विविधरंगी भूमिका साकाणारा लोकप्रिय अभिनेता स्वप्नील जोशीची या भन्नाट चित्रपटात मुख्य भूमिका आहे. नवरा बायकोचे नाते म्हणजे स्वर्गात बांधलेली गाठ. ही गाठ कधीही कुठेही कशीही जुळते, पण ही गाठ किती वेळ टिकेल हे मात्र सांगणं कठीण आहे. आता आपलं हेच प्रेम टिकवायला एका नवऱ्याला चक्क 5 जन्माआधीच्या आपल्या बायकांच्या इच्छा पूर्ण कराव्या लागणार आहेत. पण या इच्छा तो पूर्ण करू शकेल का? हे आपल्याला 'बाई गं' या चित्रपटातून समजेल. या चित्रपटाचा धमाल टीझर नुकताच रिलीज झाला आहे. या टीझरमध्ये स्वप्नील जोशीला आपल्या बायकांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी किती कसरत करावी लागते हे दिसत आहे. या चित्रपटात स्वप्नील जोशीसोबत प्रार्थना बेहेरे, सुकन्या मोने, अदिती सारंगधर, दीप्ती देवी, नम्रता गायकवाड, नेहा खान, सागर कारंडे यांच्याही महत्त्वाच्या




भूमिका आहेत. 'बाई गं' या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद पांडुरंग कृष्णा जाधव आणि विपुल देशमुख यांनी लिहिले आहेत.

दिग्दर्शक पांडुरंग जाधव यांनी जालन्याचा भूमिपुत्र कलावंत कैलास वाघमारे याची मुख्य भूमिका असलेले 'मनातल्या उन्हात', 'ड्राय डे' इत्यादी चित्रपट यापूर्वी दिग्दर्शित केले आहेत हे विशेष.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर